- नागपूर शहरातील ११ ठिकाणी सार्वजनिक-खाजगी भागीदारी (PPP) तत्त्वावर इलेक्ट्रिक व्हेईकल (EV) चार्जिंग स्टेशन उभारण्यात येत आहेत.
- विद्युत विभागाकरीता सन २०२६-२७ मध्ये रू. १३६.५० कोटी तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.
- नागपूर महानगर पालिकेच्या क्षेत्रातील पथदिवे पुढील पाच वर्षात सौरउर्जेवर चालविण्याचा स्थायी समितीचा मानस असून याकरीता आवश्यक तो प्रकल्पीय सल्लागाराची नियुक्ती करण्याच्या दृष्टिने प्रशासनाने कार्य करावे त्यामुळे या प्रकल्पाची अमंलबजावणी होवून म.न.पा. ला येणारे विद्युतदेयक कमी करण्याचा प्रयत्न करणे शक्य होईल.

क्रिडा विकास कार्यक्रम व सांस्कृतिक महोत्सव

मा. मुख्यमंत्री देवेन्द्रजी फडणवीस व मा. केन्द्रीयमंत्री नितिनजी गडकरी यांच्या सूचनेनुसार २०० क्रिडा मैदानाचा विकास करण्याचे उद्दिष्टे महानगर पालिके समोर ठेवले आहे. त्यापैकी या अमृतमहोत्सवी वर्षामध्ये ७५ क्रिडामैदानाचा विकास करण्याचा या स्थायी समितीचा मानस आहे.

नागपूर महानगरपालिका गेल्या अनेक वर्षांपासून विविध क्रीडा स्पर्धांचे व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करीत आहे. क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून नवीन खेळाडूंची निर्मिती करणे व त्यांना प्रोत्साहन देणे हे कार्य म.न.पा. द्वारे करण्यात येते. नवीन पिढीचा खेळांच्या माध्यमातून सामाजिक विकास साधण्यासाठी कबड्डी, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, बॉडी बिल्डिंग, खो-खो, बुद्धिबळ स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच यावर्षी मतिमंद (मानसिक दुर्बल), मूकबधिर व अपंग मुलांसाठी क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे. सांस्कृतिक कार्यक्रम व क्रीडा स्पर्धांचे आयोजन, उच्च गुणवत्ता प्राप्त खेळाडूंना सहाय्यता, 'खेलो नागपूर एक्सलंट स्पोर्ट्स सेंटर' निर्मिती, खेळाडू दत्तक योजना, मिशन ऑलिम्पिक योजना, विविध क्रीडांगण संकुलांची सुस्थिती व दुरुस्ती, म.न.पा. शाळांमध्ये चिल्ड्रन्स प्ले साहित्य, ॲडव्हेंचर स्पोर्ट्स व क्रॉस फिट मिक्स सेंटर निर्मिती, आधुनिक जिम साहित्य, F.B.B. प्लेईंग सेट इत्यादी योजना राबविण्यात येणार आहेत. या सर्व योजना यावर्षीदेखील सुरू राहणार आहेत. तसेच यावर्षी नव्याने फुटबॉल व आर्चरी क्रीडा प्रकारांसाठी मैदानांची निर्मिती,

मॅरेथॉन, सायक्लॉथॉन, योग विषयक कार्यक्रम, आंतरशालेय स्पर्धा व शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे.

शहरातील क्रीडा विकासाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी यावर्षीच्या अंदाजपत्रकात रु. ४५.०० कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच नागपूर शहरामध्ये नव्याने भव्य क्रीडा संकुल तयार करण्यात आले असून ते नियमित सुरू आहे. खेळाडूंना या संकुलामध्ये सर्व सुविधा अल्पदरात उपलब्ध असून, याबाबत धोरण निश्चित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

शहर वाहतूक व्यवस्था

शहरातील वाहतूक सुरळीत राहण्यासाठी वाहतुक नियंत्रक लावणे, सुस्थिती व दुरुस्ती करणे व त्यांचे प्रवर्तन करण्यासाठी तसेच एकात्मिक जंक्शन विकास प्रकल्प, पार्कींग व्यवस्थेत सुधारणा, चौरस्ते सुधारणा, वाहतुक व्यवस्थेत सुधारणा व निर्देशक फलक उभारण्याकरिता या आर्थिक वर्षात एकूण रु. २८.१० कोटीची तरतूद करण्यात आली आहे.

मा खासदार नितीनजी गडकरी ह्यांच्या संकल्पेतून सडक सुरक्षा अभियान राबविण्यात येईल, ज्यामध्ये महापौरांच्या अध्यक्षतेत नगरसेवक, ट्रेफिक डीसीपी आणि अधिकारी, एनजीओ चे सदस्य, VNIT आणि Institute of Engineers चे सदस्य आदि अशी समिती बनवण्यात येईल, वाहतुकीत बॉटलनेक निर्माण होणाऱ्या चौकावर आणि रस्त्यांच्या दर्जा आणि परिस्थिती संबंधित काम करण्यात येईल. १०० दिवसांची ही महात्वाकांक्षी मोहीम राबविण्यात येईल.

एक्सिडेंट प्रोन जागेचा शोध घेणे व त्यावर उपाय यंत्रणा करणे. वाहतुकीची कोंडी कमी करण्यासाठी आवश्यक तेथे फुट ओवर ब्रिज ची जिथे गरज आहे तेथील माहिती एक्स्पर्ट च्या माध्यमातून शासनाला देऊन तो बनवण्याचा पाठपुरावा महानगरपालिका पहिले करेल.

एका विशेष दिवसाचे उद्देश ठेऊन संपूर्ण अतिक्रमण काढून फुटपाथ पादचाऱ्यांसाठी खुले करण्यात येईल.

वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आणि पार्किंगची समस्या सोडवण्यासाठी शहरातील प्रमुख भागांमध्ये Pay & Park साठी ५ रस्ते नियोजित करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येईल. हा उपक्रम प्रारंभी प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात येईल, ज्यामुळे त्याची परिणामकारकता आणि नागरिकांचा प्रतिसाद यांचे मूल्यमापन करता येईल. या उपक्रमामुळे अव्यवस्थित पार्किंगला आळा बसेल, वाहतुकीचा खोळंबा कमी होईल आणि नागरिकांना अधिक सुलभ व शिस्तबद्ध पार्किंग सुविधा उपलब्ध होतील.

प्रायोगिक टप्पा यशस्वी ठरल्यास, समग्र पार्किंग धोरण (Parking Policy) तयार करून ते संपूर्ण शहरभर राबविण्याचा महानगरपालिकेचा मानस आहे.

क्षेत्रिय कार्यालयाचे निर्माण

क्षेत्रिय कार्यालयाच्या निर्माणासाठी या आर्थिक वर्षात रू. १०.०० कोटीची तरतुद उपलब्ध करून देण्यात आली आहे.

अग्निशमन व आणीबाणी सेवा

नागपूर शहराचा विस्तार व लोकसंख्येत वाढ झाल्याने अग्निशमन केंद्रांची वाढ करणे गरजेचे आहे. गृहमंत्रालय, भारत सरकार यांचे परिपत्रक क्र. VI-१४०२८/०२/०६-DGCD (F) दि. ०२/०८/२००६ व नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे दि.३०/०५/२००८ रोजीच्या परिपत्रकानुसार नागपूर शहराचे २१८ वर्ग कि.मी.क्षेत्रफळानुसार One Fire Station per 10 Square Kilometer Area in Urban तसेच २००८ मध्ये शासनातर्फे निर्गमित झालेल्या Gap Analysis प्रमाणे अनुज्ञेय ठरत असलेल्या २२ अग्निशमन केंद्रांचा Master Plan तयार करण्यात आलेला आहे.

सध्या १२ अग्निशमन केंद्रे व १ प्रशिक्षण केंद्र कार्यरत आहेत.लकडगंज, गंजीपेठ व केटी नगर, काटोल रोड येथील अग्निशमन केंद्रांचे सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात बांधकाम पूर्ण होऊन कार्यान्वित होणार आहेत.त्यामुळे त्या परिसरातील नागरिकांना अग्निशमन सेवेचा लाभ मिळेल.

विभागाने १ नग फोम टेंडर, ९० मीटर उंच हायड्रोलिक प्लॅटफॉर्म, ६८ मीटर उंच टर्न टेबल लॅडर, ४ नग ५००० लि. क्षमतेचे फायर टेंडर व २००० लि.क्षमतेचे मिनी फायर टेंडर खरेदी करण्याकरिता यावर खर्च अपेक्षित आहे.

अग्निशमन इमारतीच्या निर्माणासाठी तसेच नविन अत्याधुनिक यंत्र सामुग्री खरेदी करण्याकरीता व सुस्थिती दुरूस्तीसाठी भांडवली व महसुली कार्यासाठी एकुण रू. ९६.५० कोटीची तरतुद या आर्थिक वर्षात करण्यात आली आहे.

वार्डातील लोकोपयोगी कामे

या अर्थसंकल्पात वार्डातील लोकपयोगी कामांकरिता जो प्रभाग निधी प्रस्तावित करण्यात येतो रु. २५.०० लक्ष प्रभागातील प्रति सदस्याप्रमाणे राखीव ठेवण्यात आलेला आहे. तसेच मागिल आर्थिक वर्षाच्या अपुर्ण राहीलेल्या ज्यांचे कार्यादेश झालेले आहे परंतु काम सुरू झाले नाही व ज्या प्रकरणात निविदा प्रक्रीया पुर्ण झाली व विभागाने कार्यादेश निर्गमित केले नाही अशा सर्व कामांकरीता बांधील खर्चासहीत रू. ४१.३८ कोटीची या आर्थिक वर्षात करण्यात आली आहे.

ऑरेंज सिटी स्ट्रीट प्रकल्प

नागपूर महानगरपालिकेच्या वतीने शहराच्या सर्वांगीण आणि दीर्घकालीन विकासाच्या दृष्टीने एक महत्त्वाकांक्षी पाऊल उचलण्यात आले आहे - 'ऑरेंज सिटी स्ट्रीट' प्रकल्प.वर्धा रोड ते जयताळा या दरम्यानच्या सुमारे ३०.५८ हेक्टर विस्तीर्ण क्षेत्रावर हा प्रकल्प विकसित करण्यात येत आहे.नियोजनबद्ध

आणि टप्याटप्याने विकास करण्यासाठी या संपूर्ण क्षेत्राचे २४ स्वतंत्र भूखंडांमध्ये विभाजन करण्यात आले आहे.

सद्यस्थितीत, या २४ भूखंडांपैकी भूखंड क्र.1B, २A, ३, ४, ५ आणि १८ तसेच इतर व्यापारी संकुलांचा विकास DBFOS (Design, Build, Finance, Operate and Sale) या तत्त्वावर करण्यात येत आहे.या पद्धतीमुळे महानगरपालिकेवर आर्थिक ताण न येता, खाजगी गुंतवणूक आकर्षित करून प्रकल्पाची गती आणि गुणवत्ता दोन्ही सुनिश्चित करण्यात येत आहेत.आजपर्यंत या प्रकल्पातून नागपूर महानगरपालिकेला अंदाजे ८० कोटी रुपयांचा महसूल प्राप्त झाला आहे.प्रकल्पाच्या पुढील टप्यातील विकास आणि विक्री प्रक्रियेचा वेग पाहता, येत्या पाच वर्षात सुमारे ६०० कोटी रुपयांचा महसूल अपेक्षित आहे.संपूर्ण प्रकल्प पूर्णत्वास गेल्यानंतर अंदाजे २५०० कोटी रुपयांपर्यंत उत्पन्न मिळण्याची शक्यता आहे.

'ऑरेंज सिटी स्ट्रीट' हा केवळ व्यावसायिक प्रकल्प नसून, तो नागपूरच्या भावी शहरी रचनेचा एक महत्त्वपूर्ण केंद्रबिंदू ठरणार आहे.या प्रकल्पामध्ये व्यावसायिक संकुले, आदरातिथ्य (हॉटेल), वैद्यकीय सुविधा, निवासी संकुले आणि शैक्षणिक संस्था अशा विविध घटकांचा समावेश आहे.त्यामुळे रोजगारनिर्मिती, गुंतवणूक वाढ आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळणार आहे.हा प्रकल्प नागपूरला केवळ आर्थिकदृष्ट्या सक्षम करणार नाही, तर एक आधुनिक, सुव्यवस्थित आणि आत्मनिर्भर शहर घडविण्याच्या दिशेने महत्त्वाची पायरी ठरेल.पारदर्शकता, नियोजनबद्धता आणि शाश्वत विकास या तत्त्वांवर आधारित हा उपक्रम नागपूरच्या भविष्यासाठी नक्कीच मोलाचा ठरणार आहे. प्रकल्प पुर्णत्वास आल्यानंतर मनपाच्या मालमत्ता करात सुध्दा मोठ्या प्रमाणावर वाढ होईल.

जिजाऊ स्मृती शोध संस्थान मौजा-अंबाझरी, शंकर नगर

महिला सशक्तीकरण व सबलीकरणासाठी महिला उद्योजिकांकरिता मार्केटिंग हब व एक्झिबिशन सेंटर उभारण्यासाठी रु. १७.४२ कोटी रकमेस शासनाने मान्यता दिली असून रु.१०.०० कोटी निधी प्राप्त झाला आहे व रु.१० कोर्टीचे काम पूर्ण झाले आहे.

वरील कामाच्या ३६.३९ कोटी रुपयांच्या सुधारित प्राकलनास शासनाची प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सद्यस्थितीत सदर कामाचा कार्यारंभ आदेश देण्यात आलेला असून काम प्रगतीत आहे.

महानगरपालिकेचा अमृत महोत्सव

नागपूर महानगरपालिकेच्या अमृत महोत्सवी वर्षात महापौर परिषद घेण्याचा मा. महापौरांचा मानस आहे. या परिषदेमध्ये भारतातील सर्व महानगरपालिकेच्या महापौरांना आमंत्रित करण्यात येणार आहे. यामध्ये नागपूर महानगरपालिकेचे पुढे येणाऱ्या ५ वर्षातील दृष्टीकोन काय राहील, यावर भर राहील. तसेच भारतात इतर महानगरपालिका कोणत्या प्रकारे काम करीत आहे यावर विविध चर्चासत्राचे आयोजन करण्यात येणार आहे.

नागपूर महानगरपालिकेच्या अमृत महोत्सवी वर्षात महाराष्ट्र संपूर्ण महानगरपालिकेच्या स्थायी समिती अध्यक्षांची परिषद घेण्याचा स्थायी समिती अध्यक्ष यांचा मानस आहे. विविध महानगरपालिकेत स्थायी समितीचे कामकाज / कायदे /उपविधी यावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात येणार आहे.

नागपूर महानगरातील मागील २० वर्षात झालेला विकास व नागपूर महानगर पालिका या विषयावर यशवंत स्टेडीयम येथे भव्य ड्रोनशो आयोजित करण्यात येईल.

Health आरोग्य

"अटल मिशन फॉर रिजिन्युएशन अँड ट्रान्समिशन" (अमृत) अंतर्गत पाणी पुरवठा योजना

अमृत योजना

या योजनेअंतर्गत नागपूर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात राबविण्यात येत असलेल्या अधिकृत/अनधिकृत/स्लम अभिन्यासामध्ये पाणीपुरवठा प्रणालीचे विस्तारीकरण, उन्नतीकरण व बळकटीकरण या कामांचा समावेश आहे. या योजनेअंतर्गत एकूण ३२ उंच जलकुंभांचे बांधकाम व ३७७ कि.मी. पाईपलाईन टाकण्याचे प्रस्तावित होते. यापैकी सर्व जलकुंभांचे व जलवाहिनी टाकण्याचे काम पूर्ण झालेले आहे.

अमृत योजना २.०

या योजनेअंतर्गत नागपूर महानगरपालिकेच्या अधिकृत व अनधिकृत ले-आउट तसेच स्लम क्षेत्रात वितरण व्यवस्था, फीडर मेन टाकणे, जयताळा संप व पंप बसविण्याच्या कामांचा समावेश आहे. ही कामे त्वरित पूर्णत्वास नेण्यास्तव १३ पॅकेजेस (Packages) निहाय निविदा मागविण्यात आल्या असून, काम प्रगतीपथावर आहे. या प्रस्तावांतर्गत प्रामुख्याने खालील कामांचा समावेश असून कामाची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

अनु. क्र.	विवरण	प्रस्तावित	प्रत्यक्ष
१.	प्रस्तावित फीडर मेन एकूण लांबी	४२ कि.मी.	३६ कि.मी.
२.	प्रस्तावित वितरण जलवाहिन्या टाकणे एकूण लांबी	३२४ कि.मी.	२९९ कि.मी. पूर्ण
३.	जयताळा या उंचावर स्थित भागाकरिता संप व पंपची व्यवस्था करणे	--	काम पूर्ण
४.	भौतिक प्रगती	--	९५ टक्के
५.	वित्तीय प्रगती	--	७१ टक्के

उर्वरित कामे माहे जून-२०२६ पर्यंत पूर्ण करण्याचा म.न.पा.चा मानस आहे.

नॉन-नेटवर्क भाग पाणीपुरवठा

नागपूर महानगरपालिकेतील नॉन-नेटवर्क भागात पाणीपुरवठा करण्यासाठी शहरात सन २०१८ मध्ये ३४६ टँकर्स कार्यरत होते. मात्र, अमृत योजनेअंतर्गत नॉन-नेटवर्क भागात जलवाहिन्या टाकल्यानंतर व नळजोडण्या दिल्यामुळे एकूण ३०९ टँकर्सची संख्या कमी झाली आहे. सध्या केवळ ३७ टँकर कार्यरत आहेत. जलवाहिन्यांची कामे पूर्ण झाल्यानंतर ही संख्या अजून कमी होईल.

नाग नदी प्रदूषण निर्मूलन प्रकल्प, नागपूर.

शासन निर्णय क्र. F-No-J&24017/1/2023&NRCD&II] Government of India] Ministry of Jal Shakti] New Delhi&110 003, दि. १४.०३.२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

Expenditure Finance Committee (EFC) च्या बैठकीचे इतिवृत्त दिनांक १०.१२.२०२१ नुसार प्रकल्पाची पुनर्निर्धारित प्रकल्पीय राशी रु. १९२६.९९ कोटी एवढी मंजूर करण्यात आली. प्रकल्प राबविण्याकरिता केंद्र शासन रू राज्य शासन रू मनपा यांचा हिस्सा ६०:२५:१५ प्रमाणे रु. १११५.२२ : ५०७.३६ : ३०४.४१ कोटी मान्य करण्यात आला आहे. मनपाचा हिस्सा रु. ३०४.४१ कोटी इतका आहे.

नाग नदी प्रकल्पात अंतर्भूत मुख्य कामे

- एकूण सिव्हर पाईपलाईन :५२० कि.मी.
- एकूण नवीन मलशुद्धीकरण केंद्रे : ९२ द.ल.लि. (३ ठिकाणी)
- एकूण प्रस्तावित पुनर्वसन : १० द.ल.लि. (५ द.ल.लि. प्रत्येकी, एकूण २ ठिकाणी)
- नवीन पंपिंग स्टेशन्स : ७ ठिकाणी
- पुनर्वसन: २ ठिकाणी

सदरील प्रकल्पांतर्गत कामे एकूण ५ पॅकेजमध्ये करण्याचे प्रस्तावित आहे :

- CP&1 & Sewers, Pumping Stations & Interception & Diversion works & रू. ४११.७२ कोटी
- CP&2 & Construction and Rehabilitation of STPs and Pumping Stations & रु. ४१५.७९ कोटी
- CP&3 & Construction and rehabilitation of comprehensive sewer system in North Zone & रु. २५३.१७ कोटी
- CP&4 & Construction and rehabilitation of comprehensive sewer system in Central Zone & रु. २८९.२९ कोटी

- CP&5 & Non&sewerage works & Electric crematoria at Mokshdham & रु. १.३२ कोटी
- प्रकल्पाचा कालावधी ८ वर्षे आहे, परंतु कामे ५ वर्षात पूर्ण करण्याचा मनपाचा मानस आहे.
- वरील प्रकल्पाकरिता Tata Consulting Engineers (TCE) यांची प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागार (PMC) म्हणून निवड करण्यात आलेली आहे व कार्यादेश क्र. NMC/PHE/SE/49/2024, दिनांक ११.१०.२०२४ अन्वये करारनामा करण्यात आलेला असून, PMC मार्फत दिनांक ४.११.२०२४ पासून कामास सुरुवात करण्यात आलेली आहे.
- या प्रकल्पातील कामाची सद्यस्थिती : सध्याच्या परिस्थितीत प्रकल्पाच्या एकूण ५ पॅकेजपैकी, पॅकेज क्र. ५ अंतर्गत कामाची निविदा मागवून ती मंजूर झाली असून कामाचा कार्यादेश दिनांक २०.१०.२०२५ रोजी निर्गमित करण्यात आला व कामास सुरुवात करण्यात आली. उर्वरित पॅकेजपैकी, पॅकेज क्र. ३ व ४ करिता निविदा प्रसिद्ध करण्यात आली असून पॅकेज क्र. ३ मध्ये २ निविदा प्राप्त झालेल्या आहेत व तांत्रिक बिड (Technical Bid) तपासणीची कार्यवाही सुरू आहे. पॅकेज क्र. २ मध्ये निविदा प्रारूप पत्र तपासणी प्रक्रियेत आहे व पॅकेज क्र. १ चे सर्वेक्षण पूर्ण झाले असून ड्रॉईंग, डिझाईन व प्रारूप निविदा प्रपत्र इत्यादींबाबत कार्यवाही सुरू आहे. पुढील आर्थिक वर्षात इतर पॅकेजअंतर्गत कामे प्रत्यक्षात सुरू होतील.

अमृत-२.० योजनेअंतर्गत पोहरा नदी प्रदूषण निर्मूलन (सिव्हरेज) प्रकल्प

केंद्र शासन पुरस्कृत अमृत-२.० योजनेअंतर्गत नागपूर महानगरपालिकेकरिता नागपूर शहरातील साऊथ सिव्हरेज झोन व हुडकेश्वर आणि नरसाळाकरिता सांडपाणी संकलन प्रणालीचा विकास करणे व प्रक्रियेबाबतचा 'पोहरा नदी प्रदूषण निर्मूलन प्रकल्पाचा (Pollution Abatement of Pohra River Project)' समावेश करण्यात आलेला आहे.

केंद्र पुरस्कृत अमृत-२.० अभियानाची राज्यात अंमलबजावणी करण्याबाबत शासन निर्णय क्र. अमृत-२०२२/प्र.क्र.१४१/नवि-३३, मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक १४ जुलै २०२२ अन्वये निर्णयात नमूद केल्यानुसार केंद्र शासनामार्फत अनुज्ञेय अनुदान २५%, राज्य शासन अनुज्ञेय अनुदान २५% महानगरपालिकेस प्राप्त होणार आहे आणि नागपूर महानगरपालिकेचा हिस्सा ५०% आहे. या प्रकल्पाचा विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) रु. ९५७.०१ कोटींस (GST सह) मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नागपूर यांनी दिलेल्या दिनांक २८.०७.२०२३ च्या तांत्रिक मान्यतेनुसार, त्यास राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या दिनांक ८ ऑगस्ट २०२३ रोजीच्या बैठकीत मंजुरी दिलेली आहे. शासन निर्णय क्र. अमृत-२०२३/प्र.क्र.४६०/नवि-३३ मंत्रालय, मुंबई-४०००३२, दिनांक ९ नोव्हेंबर २०२३ अन्वये रु. ९५७.०१ कोटींच्या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

या प्रकल्पामध्ये एकूण अंदाजे ५३५ कि.मी. लांबीची सिव्हर नेटवर्क पाईपलाईन टाकण्यात येणार आहे. पाईपचा व्यास २०० मि.मी. ते १५०० मि.मी. इतका घेण्यात आलेला आहे. संकलित करण्यात

आलेल्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकरिता एकूण ४५ द.ल.लि. प्रति दिन क्षमतेचे प्रक्रिया केंद्र व ६ पंपिंग स्टेशन्स उभारण्यात येणार आहेत.

प्राप्त मंजुरीन्वये नागपूर महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभागामार्फत नागपूर शहरातील साऊथ सिव्हरेज झोन व हुडकेश्वर आणि नरसाळाकरिता सांडपाणी संकलन प्रणालीचा विकास करणे व प्रक्रियेबाबतचा 'पोहरा नदी प्रदूषण निर्मूलन प्रकल्पाच्या (Pollution Abatement of Pohra River Project)' कार्यान्वयनाकरिता व शासनाने दिलेल्या मुदतीत काम पूर्ण करण्याकरिता ५ पॅकेजमध्ये विभागणी करून एकूण रु. ६८९.३२ कोटींच्या (GST अतिरिक्त) निविदा काढण्यात आल्या.

- पॅकेज-१: ४५ द.ल.लि. सांडपाणी प्रक्रिया केंद्र, पंपिंग स्टेशन, वेट वेल, पंपिंग मेन. राशी रु. ९२.७८ कोटी
- पॅकेज-२: सिव्हरेज सब-झोन १. राशी रु. १४६.८१ कोटी
- पॅकेज-३: सिव्हरेज सब-झोन २ व ३. राशी रु. २२०.०० कोटी
- पॅकेज-४: सिव्हरेज सब-झोन ४. राशी रु. ९९.६१ कोटी.
- पॅकेज-५: हुडकेश्वर व नरसाळा. राशी रु. १३०.१२ कोटी.

मनपाद्वारे निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली असून, निम्नतम निविदाकारांना कार्यादेश दिनांक २५.०६.२०२४ रोजी देण्यात आले आहेत. मनपाच्या झोन क्र. १, ३, ४ व ५ अंतर्गत या कामास सुरुवात करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत ५३७ कि.मी. पैकी १७६ कि.मी. सिव्हरेज लाईन टाकण्यात आलेली असून भौतिक प्रगती ३५% आहे. या कामावर आजपावेतो १६२ कोटींचा खर्च झालेला असून आर्थिक प्रगती २०% झाली आहे. हा प्रकल्प मार्च २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचा व पोहरा नदी प्रदूषणमुक्त करण्याचा नागपूर महानगरपालिकेचा मानस आहे.

रेन वॉटर हारवेस्टींग व वॉटर (Reuse)

रेन वॉटर हारवेस्टींग व वॉटर Reuse बदल म.न.पा. प्रयत्नशील आहे. जे ग्राहक दररोज १ लाख लिटर पेक्षा जास्त पाणी वापरतात (५४ ग्राहक) असे सर्व ग्राहकांना त्यांच्या परिसरात ई.टी.पी. किंवा एस.टी.पी. यावर्षी बसविण्याबाबतची ताकीद देण्यात आलेली आहे. सर्व शासकीय कार्यालयाला त्यांच्या परिसरात रुफ टॉप वॉटर हारवेस्टींग करण्यासाठी विनंती करण्यात आलेली आहे. नागपूर शहरातील भुजल पातळीमधे वाढ व्हावी यादृष्टीने नागपूर महानगरपालिकेच्या इमारती, बगीचे यात रेन वॉटर हार्वेस्टींगची कामे हाती घेण्यात आली आहे. त्याचप्रमाणे शहरात रस्त्यालगत २०९ जागी Recharge shaft प्रणाली विविध ठिकाणी पाऊस पाणी संकलन करण्याचे प्रस्तावित आहे.

येथून पुढे टप्पा ५ किंवा मोठे, लहान रस्ते, पॉलीसी म्हणून रेन वॉटर हार्वेस्टिंग अनिवार्य करण्यात येईल आणि त्याची अंमलबजावणी कटाक्षाने करण्याचे निर्देश दिले जातील, हे सध्या लोकसहभागातूनच होणे असल्याने, सर्व लोकप्रतिनिधी आणि जनता ह्यांच्या मदतीने हे साध्य करण्याचे उद्देश ठेवले आहे.

आरोग्य विषयक कार्यक्रम

माफक दरात डायलीसीस सुविधा, ॲन्टी रेबिज व्हॅक्सीन, रक्त पेढी (Blood Bank), सिकलसेल, जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम (J.S.S.K.), दंत चिकित्सा, नेत्र चिकित्सा या सर्व योजना नागपूर महानगरपालिकेने मागील ११ वर्षापासून सुरु केलेल्या आहेत. गरीब व गरजू रुग्णांना माफक दरात डायलेसीस सुविधा महानगरपालिकेच्या स्व. प्रभाकरराव दटके महाल रोग निदान केंद्रामध्ये सुरु आहे. यामध्ये सिरोनिगेटीव्ह रुग्णांला एका वेळेस डायलेसीस करण्याकरिता रु. ५००/- व सिरोपॉझिटीव्ह रुग्णाला एका वेळेस डायलेसीस रुग्णाला रु. ६००/- याप्रमाणे खर्च नागपूर महानगरपालिका वहन करीत आहे.

१. देवडिया हॉस्पिटल

आरोग्य अभियान अंतर्गत (NUHM) मौजा नागपूर न. भु. क्र. ५३५, १५७ क्वेटा कॉलनी, जुना देवडिया दवाखान्याच्या जागेवर नवीन देवडिया मॅटरनिटी दवाखाना व शहरी कम्युनिटी हेल्थ सेंटर (UCHC) चे बांधकाम करणे (G+5)

- कामाची प्राकलन रक्कम :- रुपये ५० कोटी
- कामाचे पद क्र. : राष्ट्रीय आरोग्य अभियान (NUHM) - १४.६३ कोटी. राज्य शासन - ३४.८६ कोटी
- कामाच्या जागेचे क्षेत्रफळ : २०८४.१७ चौ. मी.
- एकूण G+5 चे बांधकाम प्रस्तावित आहे. सदर कामात ५५८५ चौ. मी. बांधकाम प्रस्तावित आहे. NUHM o UD&2 विभागाच्या संयुक्त अनुदानातून दवाखान्याचे काम प्रस्तावित असून सदर कामास NUHM मार्फत रु.१४.६४ कोटी व UD&2 मार्फत रु.३५.८६ कोटी मंजुरी प्राप्त आहे. लकडगंज व इतवारी क्षेत्र हा नागपूर शहरातील दाटीवाटीचा परिसर असून तेथील नागरिकांना चांगल्या आरोग्याच्या दृष्टीने सोयीचे व्हावे म्हणून प्रस्तावित दवाखान्याचे बांधकाम करणे आवश्यक आहे. सदर कामाचे पायाभरणीचे बांधकाम व वरील ५ मजल्यांचे बांधकाम पूर्ण झाले असून उर्वरित बांधकाम प्रगतीत आहे.
- Integrated Diagnostic & Dialysis Centre at MouzaJattarodi

नागपूर शहरात उभारण्यात येत असलेल्या आधुनिक डायग्नोस्टिक सेंटर प्रकल्पाबद्दल सांगताना मला आनंद होत आहे.या केंद्रात MRI, CT&Scan, PET&Scan, डिजिटल एक्स-रे, सोनोग्राफी तसेच सर्व पॅथॉलॉजी तपासण्या एकाच छताखाली उपलब्ध होणार आहेत.

या प्रकल्पाचा मुख्य उद्देश म्हणजे नागरिकांना जलद, अचूक आणि परवडणारी निदान सेवा उपलब्ध करून देणे, ज्यामुळे वेळेत उपचार सुरू होऊ शकतील आणि आरोग्य सेवा अधिक परिणामकारक बनेल.

या प्रकल्पाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे - सर्व तपासण्या CGHS दरांपेक्षा किमान २०% कमी दरात उपलब्ध करून दिल्या जातील.त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठा आर्थिक दिलासा मिळेल.

हा प्रकल्प PPP (Public Private Partnership) पद्धतीने राबविण्यात येत असून, उच्च दर्जा, आधुनिक तंत्रज्ञान आणि उत्तम सेवा मानके सुनिश्चित करण्यावर विशेष भर दिला जाणार आहे.याकरिता नागपूर महानगरपालिका मालकीची जागा, मौजा जाटतरोडी येथील आयसोलेशन हॉस्पिटल परिसरातील २६९० चौ.मी.क्षेत्र आधुनिक डायग्नोस्टिक सेंटर प्रकल्पाकरिता उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

धंतोली आणि सेंट्रल बाजार रोडसारख्या भागांमध्ये वाढत असलेल्या रुग्णालयांची संख्या लक्षात घेता, या परिस्थितीकडे अडचण किंवा 'लायबिलिटी' म्हणून न पाहता, ती एक संधी आणि 'ॲसेट' म्हणून विकसित करण्यावर महानगरपालिका भर देईल.

यासाठी या भागांचे नियोजनबद्ध पुनर्रचना (planned development) करण्यात येईल. रुग्णालय परिसरात सुव्यवस्थित पार्किंग व्यवस्था, रुग्णांच्या नातेवाईकांसाठी स्वच्छ शौचालये, तसेच निवारा केंद्र (waiting/rest shelters) उभारण्यात येतील.

या उपाययोजनांमुळे रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांना सुलभता मिळेल, तसेच परिसरातील रहिवाशांना होणारा त्रास कमी होईल. परिणामी, आरोग्यसेवा, नागरी सुविधा आणि स्थानिक जीवनमान यांचा समतोल साधणारी एक सुसंगत व सक्षम इकोसिस्टम निर्माण होईल.

आरोग्य (औषधी) विभाग

मनपा रुग्णालये अद्ययावत करण्यासाठी केलेले प्रयत्न व नाविन्यपूर्ण योजना

मनपातील ६ विधानसभा क्षेत्रात प्रत्येकी २ युपीएचसी चे प्रोटोटाइप निश्चित करून, १२ नव्या दमाच्या युपीएचसी तयार करण्याचा मानस असेल. त्या साठी विशेष तरतूद ठेवण्यात आली आहे. पुढील ५ वर्षात ५३ युपीएचसी नवनिर्मित करून जनतेच्या चांगल्या आरोग्य साठी प्रयत्न करण्याचा मानस आहे.

- नागपूर महानगरपालिकेची एकूण लोकसंख्या २९,४०,४३७ असून, त्यात नागपूर शहराची एकूण स्लम (झोपडपट्टी) लोकसंख्या ८,०९,३२७ आहे. नागपूर महानगरपालिका संपूर्ण नागपूर शहरात आरोग्य सेवा पुरविण्यासाठी प्रयत्नशील आहे.
- नागपूर महानगरपालिका अंतर्गत ०३ आंतररुग्णालये 24x7 आरोग्य सेवा उपलब्ध करून देतात. त्यामध्ये इंदिरा गांधी रुग्णालय व पाचपावली स्त्री रुग्णालयात माता व बाल संगोपन अंतर्गत येणाऱ्या सर्व आरोग्य सेवा पुरविल्या जातात. तसेच आयसोलेशन रुग्णालय येथे जलजन्य (साथीचे) आजारांचे उपचार व इतर आरोग्य सेवा दिल्या जातात. सदर रोग निदान केंद्र व महाल रोग निदान केंद्र कार्यरत असून, यामध्ये एक्स-रे, क्षयरोग विभाग, मानसेवी तज्ज्ञ, Sentinel Surveillance Unit for Dengue, हिवताप व हत्तीरोग विभाग सुरू आहेत.

- सर्व रोग निदान केंद्रे, ॲलोपॅथिक दवाखाने, होमिओपॅथी दवाखाने, युनानी दवाखाने हे काळी ८.०० ते दुपारी २.०० या वेळेत प्राथमिक आरोग्य सेवा देतात. तसेच प्राकृतिक चिकित्सा केंद्र व पंचकर्म चिकित्सा केंद्र सकाळी ७.०० ते दुपारी १.०० या वेळेत 'आयुष' सेवा देतात.
- राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (NUHM) अंतर्गत ५१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे तसेच १५ व्या वित्त आयोगांतर्गत मंजूर ११३ पैकी ९३ Urban Health Wellness Centers कार्यान्वित आहेत. उर्वरित केंद्रे कार्यान्वित होण्याच्या मार्गावर आहेत.
- १५ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये पॉलिक्लिनिक (७ प्रकारच्या Specialist Services) सेवा दिल्या जातात. NUHM तसेच १५ व्या वित्त आयोगांतर्गत येणारे सर्व राष्ट्रीय कार्यक्रम तसेच पदभरती प्रक्रिया राबविण्यासाठी NUHM Cell कार्यान्वित आहे. त्यामध्ये शहर कार्यक्रम व्यवस्थापक, शहर लेखा व्यवस्थापक, शहर गुणवत्ता व्यवस्थापक तसेच इतर कर्मचारी कार्यरत आहेत.
- मनपा अंतर्गत के.टी. नगर येथील मनपाच्या इमारतीत केंद्र शासनाचे Metropolitan Surveillance Unit कार्यान्वित आहे.
- मनपा अंतर्गत PPP तत्त्वावर महाल रोग निदान केंद्रांतर्गत डायलिसिस प्रकल्प वर्ष २०११ पासून कार्यान्वित आहे. त्या प्रकल्पांतर्गत (१) अश्विनी किडनी अँड डायलिसिस सेंटर, (२) मिडास मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल, (३) श्रावण हॉस्पिटल अँड किडनी इन्स्टिट्यूट्स, (४) ग्रेसियस डायलिसिस केअर युनिट, (५) संत गोविंदराम साहेब डायलिसिस सेंटर
- स्व. भानुताई गडकरी मेमोरियल डायग्नोस्टिक सेंटर या संस्थांमधून डायलिसिस प्रकल्प राबविला जातो. प्रकल्पांतर्गत म.न.पा. कार्यक्षेत्रातील व इतर संस्थांनी/रुग्णालयांनी डायलिसिस सेवा देण्याबाबत समर्थता दर्शविल्यास त्यांनाही अटी व शर्तींच्या अधीन राहून प्राधान्य देण्यात येईल.
- म.न.पा. अंतर्गत दंतरोग प्रकल्प 'नबिदाद स्मृती संस्था' यांच्यामार्फत सदर रोग निदान केंद्र येथे कार्यान्वित आहे.
- म.न.पा. अंतर्गत जन्म-मृत्यू विभागामार्फत नवजात बालकांना जन्माचा दाखला देणे डिसेंबर २०२२ पासून सुरू करण्यात आले आहे.
- म.न.पा. अंतर्गत महाल रोग निदान केंद्र येथे आधीपासून फिजिओथेरपी सेंटर स्थापित असून, मागील वित्तीय वर्षात इंदिरा गांधी रुग्णालय, पाचपावली सूतिकागृह, सदर रोग निदान केंद्र व हिवरी नगर यु.पी.एच.सी. येथे फिजिओथेरपी युनिट सुरू करण्यात आले आहे.
- Cochlear Implant सेवा सुरू करण्यात आली असून, याकरिता IGMC, GMC, नीती हॉस्पिटल, नेल्सन हॉस्पिटल, किंग्स-वे हॉस्पिटल, एन.के.पी. साळवे इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस अँड रिसर्च सेंटर अँड लता मंगेशकर हॉस्पिटल, शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च

सेंटर, दत्ता मेघे मेडिकल कॉलेज ही रुग्णालये नामनिर्देशित करण्यात आली आहेत. वर्ष २०२५-२०२६ मध्ये एकूण १२ रुग्णांची शस्त्रक्रिया करण्यात आली आहे.

- Digiswastha Foundation यांच्या सहाय्याने व HCL आणि WCL यांच्या आर्थिक सहाय्याने नागपूर महानगरपालिका येथे ०१ रुग्णालय (इंदिरा गांधी रुग्णालय), ५ यु.पी.एच.सी. (चिंचभवन, जागनाथ बुधवारी, गोरेवाडा, नरसाळा, भरतवाडा) व २ यु.एच.डब्ल्यू.सी. (चकोले, हसनबाग) येथे Telemedicine प्रकल्प राबविण्यात येत आहे. एकूण १८ प्रकारच्या विशेषज्ञ वैद्यकीय सेवा Telemedicine द्वारे दिल्या जातात. फेब्रुवारी २०२४ पासून सेवा सुरू असून, जानेवारी २०२६ अखेर १३,२४७ रुग्णांनी लाभ घेतला आहे.
- राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये नेत्ररोग तपासणी शिबिरे राबविण्यासाठी माधव नेत्रालय, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर तसेच ए.बी.ओ.आय. इन्स्टिट्यूट यांना विविध झोननिहाय मोफत नेत्ररोग तपासणी शिबिरे घेण्यासाठी सहमती देण्यात आली आहे. तपासणीनंतर रुग्णांना पुढील उपचाराकरिता संदर्भित करण्यात येते.
- Swayam Digital Prevention Health Care Ecosystem मशीनद्वारे ०१ रुग्णालय (इंदिरा गांधी रुग्णालय) व ५ यु.पी.एच.सी. (बिडीपेठ, मानेवाडा, सोमवारी क्वार्टर, नंदनवन, दिघोरी) येथे एकूण ६५ प्रकारच्या रक्त व लघवी तपासण्या तात्काळ करण्यात येतात.
- NCD Mobile Van करिता नागपूर महानगरपालिका व सनोफी व पिरामल स्वास्थ इंडिया या कंपन्यांमध्ये झालेल्या करारानुसार ०२ MMU गाड्या चालविण्यात येतात. त्यामध्ये मुख कर्करोग व स्तन कर्करोगाची तपासणी दर आठवड्याला सोमवार ते शुक्रवार करण्यात येते.
- Rotary Immunization Van अंतर्गत झोननिहाय आरोग्य लसीकरण वाहन दर महिन्याला निश्चित वेळापत्रकानुसार लायन्स क्लबद्वारे उपलब्ध करण्यात येते. यामार्फत सुटलेल्या लाभार्थ्यांचे लसीकरण अतिजोखमीच्या क्षेत्रांत नियमितपणे करण्यात येते.
- 'कर्करोग मुक्त नागपूर' च्या अनुषंगाने, अति गर्दीच्या ठिकाणी आणि प्रत्येक प्रभागात ह्या आर्थिक वर्षातून दोनवेळा तोंडाचा कर्करोग, महिलांसाठी ब्रेस्ट कर्करोगाचे चेक अप करण्यात येईल. नागपुरातील शासकीय रुग्णालय तसेच एन.सी.आय. सारख्या नावाजलेल्या संस्थांच्या माध्यमातून हे केले जाईल. सर्व नगरसेवकांनी जास्तीत जास्त जनतेपर्यंत हे पोहोचवून देण्यास मदत करावी.

इंदिरा गांधी व पाचपावली रुग्णालय

पाचपावली प्रसुतीगृह (रुग्णालय) याचे नामकरण करण्याचा मानस असून पाचपावली रुग्णालयाचे नाव स्व. लक्ष्मीबाई केळकर स्त्री रुग्णालय असे करण्यात यावे यांस सभागृहाने मान्यता प्रदान

करावी, ही विनंती. तसेच इंदिरा गांधी रूग्णालय व पाचपावली प्रसुतीगृह येथे या आर्थिक वर्षात पब्लीक प्रायव्हेट पार्टनरशिप (PPP) म्हणजे सार्वजनिक खाजगी भागीदारी करणारा त्याचा मुख्य उद्देश सार्वजनिक आरोग्य सुविधांमध्ये सुधारणा करणे, रूग्णांना कमी दरात दर्जेदार आरोग्य देणे हा आहे. तसेच या दोन्हीही रूग्णालयात अत्याधुनिक फिजीओ सेंटर तयार करण्याचा मानस आहे.

आरोग्य (औषधी) विभागास सन २०२६-२७ मध्ये महसुली व भांडवली मिळून रू. ३७.१९ कोटी ची तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

महापौर नेत्र ज्योती योजना

संपूर्ण देशात बऱ्याच प्रमाणात मोतीया बिंदुचे रुग्ण निघत आहे. जर त्यांचेवर वेळीच मोतीया बिंदुची शस्त्रक्रिया झाली नाही तर त्या व्यक्तीचे जिवनात अंधत्व येण्याची शक्यता नाकारता येत नाही. यावर उपाययोजना म्हणून नागपूर शहरात प्रत्येक प्रभागात मोतीया बिंदु शस्त्रक्रिया संबंधाने नेत्र तपासणी शिबीरे आयोजीत करुन त्या रुग्णांची मोतीया बिंदु शस्त्रक्रिया नि:शुल्क करण्याचा आमचा मानस आहे. शस्त्रक्रिये नंतर त्यांना चष्मा सुध्दा नि:शुल्क पुरविण्याची जबाबदारी महानगरपालिका घेत आहे. ही योजना सुध्दा महात्मे नेत्रपेढी व नागपूर महानगरपालिका यांच्या संयुक्तीक उपक्रम राहील. या योजनेसाठी लागणाऱ्या सर्व खर्चांची व्यवस्था सी.एस.आर. निधी किंवा शासनाच्या विविध योजना मधून करण्याची जबाबदारी महात्मे नेत्रपेढी या संस्थेची राहील.

महापौर हर्ष, मुस्कान योजना

ह्यात ज्यांचे दात वेडे वाकडे आहे, त्या मुलींना लग्नाच्या वेळी वेगळ्या त्रासाला सामोरे जावे लागते आणि त्या साठी त्यांना एक चांगले हास्य मिळावे आणि हर्शोल्लीत व्हाव्या म्हणून महापौर हर्ष योजना ज्यात २५ लक्ष रुपयांचे विशेष अनुदान असेल, १८ वर्षाखालील मुलींना त्याचा लाभ घेता येईल.

सिकलसेल डे केअर व अनुसंधान केंद्र

नागपूर शहर हे महाराष्ट्रातील सिकलसेल चे हॉटस्पॉट म्हणून ओळखल्या जाते. ज्या प्रमाणात या रोगांवर उपचार करण्याची यंत्रणा पाहिजे त्या प्रमाणात या भागात यंत्रणा उपलब्ध नाही. या रोगांचे निदान एका छताखाली, एकत्रित दृष्टया झाले पाहिजे म्हणून महानगरपालिकेच्या पाचपावली सुतिकागृह या इमारतीमध्ये सिकलसेल डे केअर व अनुसंधान केंद्र यावर्षी पासून सुरु करण्याचा मानस आहे. सिकलसेल रुग्णांची तपासणी ही नि:शुल्क उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. हा आजार इतर व्याधीसह असो, प्रसुती असो या सर्व बाबींविषयी कॉन्सीलींग करणे सुध्दा एका छताखाली उपलब्ध राहील. या शिवाय समाजात या विशेष रोगाचा प्रसार जास्त आहे अशा ठिकाणी प्रशासनाचे माध्यमातून तपासणी शिबीरे आयोजीत करुन रुग्णांचा शोध घेऊन त्यांना उपचार उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी "सिकलसेल डे केअर व अनुसंधान केंद्र" यांची राहील. तसेच भारत सरकार, नागपूर महानगरपालिका व महात्मे नेत्रपेढी संस्था या तिन्ही संस्थांद्वारे हा संयुक्त प्रकल्प राबविला जाईल. लहानात लहान तपासणी पासून ते

मोठयात मोठी तपासणी पर्यंत सर्व नि:शुल्क सेवा या केंद्राद्वारे उपलब्ध राहील. या केंद्रासाठी लागणारे मनुष्यबळ, टेस्टींग लॅब, मशिनरीज, वैद्यकीय मनुष्यबळ व इतर सर्व आवश्यक व्यवस्था सहज उपलब्ध करुन देण्यात येईल. व्यवस्थेच्या दृष्टीने महानगरपालिकेद्वारे केवळ २ नर्स व १ अटेंडंट उपलब्ध करणे बंधनकारक आहे. तसेच या प्रकल्पाला लागणारी जागेची व्यवस्था ही महानगरपालिका करेल. हा प्रकल्प सुरु झाल्या नंतर संपूर्ण विदर्भात नव्हे तर संपूर्ण भारतासाठी सिकलसेल अनुसंधान सेंटर म्हणून ओळख होईल व महानगरपालिकेचे नाव गौरवान्वीत होईल अशी मला खात्री आहे.

धोकादायक व जोखिम असलेल्या कामांचे यांत्रिकीकरण (कारखाना विभाग)

आरोग्य विभागाने धोकादायक व जोखिम असलेल्या कामांच्या यांत्रिकीकरण करण्याच्या कामास मागील तीन वर्षापासून सुरुवात झालेली आहे. शहराचा व्याप लक्षात घेता शासकीय अनुदानातून व म.न.पा. सहभागातून मशीनरी व इतर साहित्य काही प्रमाणात खरेदी करण्यात आले आहे. या धोकादायक कामाचे १०० टक्के यांत्रिकीकरण करण्याचा आमचा मानस आहे या करीता योग्य तरतूद करण्यात आली आहे.

आरोग्य विभागातील संपूर्ण डेटा चे डिजिटलयाझेशन

डेटा इस न्यू ओईल असे म्हणतात नागपूरचे आरोग्य अधिक बळकट करायचे असल्यास त्या साठी विशेष प्रयत्न करावे लागणार आहे. आणि त्या अनुषंगाने सर्व युपिएचसी चा डेटा, डायलिसीस सेंटर चा डेटा आणि आयजीआर आणि पाचपावली दवाखान्याचा डेटा हा डिजिटल करण्यासाठी विशेष प्रयत्न करून त्या अनुषंगाने तरतूद केली आहे.

वाहने व यांत्रिकी (कारखाना) विभाग

ग्रेट नाग रोडवर, बैद्यनाथ चौकाजवळ म.न.पा. चे यांत्रिकी (कारखाना) विभागाचे कार्यालय व कार्यशाळा असून, सध्या विभागात एकूण अधिकारी/कर्मचारी यांची मंजूर पदे ९२ आहेत. या अंतर्गत वेगवेगळ्या पदांवर १९ अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत व ७६ पदे रिक्त आहेत. नागपूर महानगरपालिकेतील अग्निशमन व हॉट मिक्स प्लांट वगळून इतर सर्व विभागांतर्गत येणारी सरासरी २७६ वाहने/मशिनरी/इंधन मशिनरी यांची देखभाल/दुरुस्ती केली जाते. म.न.पा. वाहने व यांत्रिकी (कारखाना) विभागाद्वारे पदाधिकारी/अधिकारी यांच्या माताहत कार्यरत वाहने तसेच आरोग्य विभाग, सामान्य प्रशासन विभाग व इतर विभागांतील अशी एकूण २७६ वाहनांची/मशिनरी/इंधन मशिनरीची देखभाल/दुरुस्तीची कामे वेळेची निकड व वाहनांची आवश्यकता लक्षात घेऊन अतिशीघ्र, लवकरात लवकर दुरुस्त करून कार्यान्वित करण्यात येतात. तसेच कारखाना विभागातर्फे म.न.पा. मालकीची वाहने/मशिनरींचा विमा काढण्याची कार्यवाही, मोटार अपघात क्लेम कार्यवाही, इंधन पुरवठा नियोजन व देयक भरणा, प्रादेशिक परिवहन विभागाशी संबंधित कार्यवाही, नवीन वाहनेधमशिनरी खरेदीची कार्यवाही, इत्यादी करण्यात येते.

वर्ष २०२५-२६ या आर्थिक वर्षात मनपाच्या प्रकल्प (I) विभागामार्फत नवीन कार्यालयीन इमारतीचे बांधकाम करण्यात आलेले असून, त्यात बसण्याची आसनव्यवस्था, विद्युत व्यवस्था तसेच स्वच्छतागृहाची बांधकाम व्यवस्था करण्यात आलेली आहे.

नवीन तंत्रज्ञानांतर्गत वेगवेगळ्या मॉडेल्सनुसार वाहने, मशिनरी, सीवर क्लिनिंग मशीन, एक्स्कॅव्हेटर, डोझर, एक्स्कॅव्हेटर/लोडर इत्यादी म.न.पा. द्वारे खरेदी करण्यात आले आहेत. तसेच, शहरातील कचऱ्याची सुचारू पद्धतीने वाहतूक करून विल्हेवाट लावण्याकरिता घनकचरा व्यवस्थापन विभागांतर्गत कार्यरत A.G. Enviro Solution Pvt. Ltd. व BVG या शहरातील कचऱ्याचे संकलन व वाहतूक करणाऱ्या एजन्सीकडून दंडात्मक स्वरूपात त्यांच्या देयकातून कपात केलेल्या राशी अंतर्गत, सन २०२४-२५ मध्ये ३० नग तसेच सन २०२५-२६ मध्ये २५ नग असे एकूण ५५ नग Tata Ace Mounted Box Type Tipper (Closed Body & Tipping Unit) खरेदी करण्यात आले आहेत. मनपाची विविध वाहने/मशिनरी देखभाल/दुरुस्तीची कामे हाताळण्याकरिता यांत्रिकी (कारखाना) विभाग अद्ययावत करण्याचा मानस आहे. नवीन तंत्रज्ञानाचा अंतर्भाव असणाऱ्या यंत्रसामग्रीचा वापर वाहने/मशिनरी देखभाल/दुरुस्तीकरिता करणे ही काळाची गरज असून, महानगरपालिका त्या दिशेने प्रयत्न करीत आहे.

वाहने व यांत्रिकी (कारखाना) विभागासाठी सन २०२६-२७ रू. ४०.४५ कोटी तरतूद प्रस्तावित आहे.

लोकस्वास्थ सेवेत गुणात्मक सुधारणा व रोगनिदान शिबीर/जनजागृती

नागपूर महानगरपालिकेद्वारे लोकस्वास्थ सेवेत गुणात्मक सुधारणा व रोगनिदान शिबीर या योजने अंतर्गत यावर्षी विविध शिबीरांचे आयोजन करण्यात येणार आहे. यामध्ये कन्या भ्रुणहत्या निषेधार्थ जनजागृती, महिला वर्गातील स्तनांचा व गर्भाशय मुखाचा कर्करोगाचे तपासणी शिबिराचे आयोजन करणे, ज्येष्ठ नागरिकांकरीता रोगनिदान शिबीराचे आयोजन करणे व जागतिक स्वास्थ्य दिन व स्वस्थ शिशु स्पर्धा याकरिता आवश्यक तरतूद करण्यात आलेली आहे.

आरोग्य विषयक सर्व कामासाठी व इतर घटकांसाठी या अर्थसकंल्पात योग्य ती आर्थिक तरतुद करण्यात आली आहे.

शहरातील दहन घाट व कब्रस्तानाचा विकास करणे

नागपूर शहरात एकुण २१ दहन घाट आहेत. या २१ दहन घाटापैकी २ घाटावर डिझेल व २ घाटावर एल.पी.जी द्वारे सुरू असुन त्यापैकी एकाचे काम पूर्णत्वास आलेले आहे. म.न.पा.च्या सर्व दहनघाटावर एल.पी.जी किंवा विद्युत शवदाहिनी टप्प्या टप्प्यात बसविण्याचे प्रस्तावित आहे. जेणे करून पर्यावरण पुरक व्यवस्था सर्व घाटांवर निर्माण होईल.

यंदाच्या अर्थसंकल्पात सर्व दहन घाटांना पुनर्जीवित करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येईल. सभामंडप, पर्यावरण पूरक केंद्र, सीसी टीवी केमेरे, सोलर, लाइव करण्याचे तांत्रीकीकरण आदिचा समावेश करून मनपा, शासन आणि लोकसहभाग ह्या द्वारे हे नवनिर्मित करण्यात येतील. यामध्ये प्रामुख्याने अस्तित्वात असलेले गंगाबाई घाट, मोक्षधाम घाट, अंबाझरी घाट, वैशालीनगर घाट, पारडी घाट, मानेवाडा घाट, दिघोरी घाट, इत्यादी व नागपूर शहरातील कब्रस्तान आणि इतर घाटांसाठी महसुली व भांडवली मिळून ५२.९० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

Sanitation and S.W.M.
स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापन

घनकचरा व्यवस्थापन

वर्ष २०२४ ते २०२७ : भांडेवाडी येथे SLF मधील १५.३० लक्ष मे. टन जुन्या कचऱ्याचा बायोमायनिंग प्रकल्प भांडेवाडी डम्पिंग यार्ड येथे लँडफिलमध्ये उर्वरित जमा असलेल्या १५.३० लक्ष टन जुन्या कचऱ्यावर बायोमायनिंग प्रक्रिया करण्याकरिता 'स्वच्छ भारत मिशन-२' अंतर्गत मंजुरी प्राप्त असून, फेब्रुवारी २०२४ मध्ये प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात आली. सद्यस्थितीत ९.५ लक्ष टन जुन्या कचऱ्यावर बायोमायनिंग प्रक्रिया करण्यात आलेली आहे. हे काम जून २०२७ मध्ये पूर्ण करण्याचा मनपाचा मानस आहे. यामुळे मनपाची १९ एकर जागा मोकळी होणार आहे. या प्रकल्पावर एकूण रु. ११९.३४ कोटींचा खर्च अपेक्षित आहे.

वर्ष २०२३ ते २०३८ रू भांडेवाडी, नागपूर येथे एकीकृत घनकचरा व्यवस्थापनाकरिता 1000+20% क्षमतेचे घनकचरा प्रक्रिया केंद्र (15+15) ३० वर्षांकरिता डिझाईन, फायनान्स, बांधा, स्वमालकीचा करा, वापरा आणि हस्तांतरण (DFBOOT) या धर्तीवर उभारणे आणि देखभाल-दुरुस्ती करणे. स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत नागपूर शहराकरिता घनकचरा व्यवस्थापनाचा सुधारित विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) शासनाद्वारे १४ मे २०२१ रोजी मंजूर करण्यात आला. त्यामध्ये अंतर्भूत प्रमुख घटक ६०० TPD Composting Plant आणि ३८० MTPD MRF Centre करिता एकत्रितरित्या 1000+20% ओल्या व सुक्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्याकरिता मनपाद्वारे रीतसर निविदा प्रक्रिया राबविण्यात येवून M/s. SusBDe LOC Nagpur Pvt- Ltd- यांची उच्चतम आर्थिक निविदा (Zero Tipping Fees with Annual Royalty to NMC) स्वीकारण्यात येऊन त्यांना 'Letter of Intent' दिनांक ०६.१०.२०२२ रोजी देण्यात आले व त्यांच्याशी करारनामा दिनांक १३.०४.२३ ला करण्यात आलेला आहे. या प्रकल्पाची राशी रु. ३१९.०० कोटी इतकी आहे. कंपनीला कचऱ्यापासून कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्प निर्मितीकरिता भांडेवाडी येथील ३० एकर जागा लायसन्स बेसिसवर देण्यात आलेली आहे. कंपनीद्वारे बांधकाम प्रगतीपथावर असून हा प्रकल्प जुन २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचा मनपाचा मानस आहे. हा प्रकल्प नाविन्यपूर्ण असून कंपनीद्वारे घनकचरा प्रक्रियेकरिता मनपातर्फे कुठलीही टिपिंग

फी न घेता स्वखर्चाने प्रकल्पाची उभारणी करण्यात येणार आहे. या प्रकल्पामध्ये कचऱ्यावर प्रक्रिया करून बायोगॅस, कंपोस्ट, आरडीएफ (RDF) यांसारखे बाय-प्रॉडक्ट तयार होणार असून ते विकण्याचे अधिकार कंपनीला देण्यात आलेले आहेत, ज्यामधून होणाऱ्या उत्पन्नातून प्रथम रु. १५ लक्ष प्रति वर्ष मनपास देऊ केलेले आहेत. तसेच देखभाल व दुरुस्ती कालावधीत वाढीव रॉयल्टी देण्याबाबत कंपनीने सादर केलेले आहे. या प्रकल्पाचा कालावधी १५ वर्षे असून कंपनीद्वारे करण्यात आलेल्या कामाचे ५ वर्षानंतर गुणवत्तेचे आकलन करून त्यांना प्रकल्प कालावधी पुन्हा १५ वर्षे वाढवून देण्यात येणार आहे. तसेच सद्यस्थितीत कंपनीद्वारे भांडेवाडी येथील ९ एकर जागेत दैनंदिन २०० ते ३०० मे. टन कचऱ्यावर प्रक्रिया करणे सुरू आहे.

वर्ष २०२५ ते २०३० रू भांडेवाडी येथे 500+10% मे. टन प्रतिदिन कचऱ्यावर प्रक्रिया केंद्र उभारणे, कचऱ्यावर प्रक्रिया करणे, त्याची विल्हेवाट लावणे व ५ वर्षाकरिता देखभाल आणि दुरुस्ती करणे. नागपूर शहरातून दररोज १३०० ते १४०० मे. टन प्रतिदिन घनकचऱ्याची निर्मिती होते. नागपूर शहरातून सद्यस्थितीत निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याचे प्रमाण येणाऱ्या पुढील वर्षांमध्ये बऱ्याच प्रमाणात वाढीव राहील. याकरिता घनकचऱ्याची निर्मिती व त्यावरील प्रक्रिया यांमधील अंतर पूर्ण करण्याच्या दृष्टीने भांडेवाडी, नागपूर येथे घनकचऱ्यावर प्रक्रिया आणि विल्हेवाट लावण्यासाठी 500 MTPD+10% सेमी-ऑटोमॅटिक मॉड्यूलर कॉम्पॅक्ट सुविधेचे (इंटिग्रेटेड सिस्टम कंपोस्टिंग आणि एमआरएफ) डिझाइन, वित्तपुरवठा, पुरवठा, स्थापना आणि कमिशनिंग तत्त्वावर आधारित निर्माण करणे, तसेच ५ वर्षांच्या कालावधीसाठी देखभाल व दुरुस्ती करण्याकरिता टिपिंग फीसाठी लागणारा खर्च मनपा निधीतून करण्याचे आणि निविदा मागविण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक, मनपा यांनी ठराव क्र. ९१/स्थायी समिती/प्रशासक, दिनांक ०२.०६.२०२५ अन्वये मंजुरी प्रदान केलेली आहे. प्राप्त मंजुरीन्वये उपरोक्त नमूद कामास्तव निविदा दिनांक १० जून २०२५ ला मागविण्यात आल्या असता. निम्मतम निविदाकार मे. भुमि ग्रीन एनर्जी यांची निम्मतम दराची रूपये ८४४/- प्रति मे. टन निविदा प्राप्त झाली. निम्मतम निविदाकार मे. भुमि ग्रीनएनर्जी यांच्याशी अंतिम वाटाघाटी करून अंतिम दर रूपये ७७२ प्रति मे. टन दर निश्चिती करण्यात आलेली आहे.करारनामा दिनांक ०१.१०.२०२५ ला करण्यात आलेला आहे. कंपनीद्वारे प्रक्रिया केंद्र उभारण्यात आले असून दिनांक ८ जानेवारी २०२६ पासून पूर्ण क्षमतेने कचऱ्यावर प्रक्रिया करणे सुरू आहे.

नागपूर महानगरपालिकेमध्ये घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत दररोज सरासरी १४०० टन कचरा घराघरांतून संकलन करून भांडेवाडी येथे वाहतूक करण्यात येते. याकरिता २ एजन्सींची नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर एजन्सीद्वारे घराघरांतून कचरा उचल करण्यासंदर्भात VTMS प्रणाली विकसित करून ही प्रणाली COC सोबत जोडण्यात येत आहे. तसेच शहरातील सामुदायिक शौचालये व मुतारीघरांची दिवसातून ३ वेळा साफसफाई करण्याकरिता एजन्सीची नेमणूक करण्यात आली असून, त्यांच्या कामावर निगराणी ठेवण्यासाठी ऑनलाईन प्रणाली विकसित करण्यात आलेली आहे व त्या माध्यमातून कंपनीच्या कामावर निगराणी ठेवण्यात येत आहे.

सफाई कामगारांचे काम हे जोखमीचे असल्यामुळे त्यांच्याकरिता अपघाती विमा काढण्याचा मानस महानगरपालिका प्रशासनाचा आहे. याकरिता ५६ लक्ष निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. यासोबतच सर्व सफाई कामगारांना सफाई करताना आरोग्यविषयक त्रास उद्‌भवू नये, याकरिता PPE Kit उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

भूमिगत मलवाहिनी सफाईचे काम मनुष्यबळाने करू नये, अशा प्रकारचे कायदे शासनामार्फत निर्गमित करण्यात आलेले आहेत. ही बाब लक्षात घेता या कामाचे १००% यांत्रिकीकरण करण्याचे प्रस्तावित आहे. शहरातील घनकचरा व्यवस्थापनाच्या दृष्टीने चतुरूसूत्री (4R) अवलंबिण्याचे प्रस्तावित आहे. यात घनकचरा कपात, पुनर्वापर, पुनर्प्रक्रिया, नाकारणे (Reduce, Reuse, Recycle,Refuse) ही चतुरूसूत्री अंमलात आणून भांडेवाडी येथे जाणाऱ्या कचऱ्याचे प्रमाण कमी करण्याचे नियोजन असून, १० झोन अंतर्गत १० RRR सेंटर्स स्थापित करून या RRR केंद्रांची जबाबदारी महिला बचत गटांना सोपविण्यात आलेली आहे. बचत गटांतील महिलांच्या माध्यमातून निरुपयोगी वस्तूंना पुनर्वापरासाठी योग्य बनवले जाते व त्या वस्तू गरजू लोकांपर्यंत पोहोचविल्या जातात. सोबतच काही निरुपयोगी वस्तू कंपनीला दिल्या जातात व कंपनीद्वारे त्या वस्तू पुनर्वापरयोग्य बनविल्या जातात. या उपक्रमामुळे महिलांना आर्थिक व सामाजिक दृष्ट्या सक्षम होण्यास मदत होईल व शहरातील पर्यावरण आणि स्वच्छतेला चालना मिळेल.

याकरिता घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत नियोजनबद्ध व सुनियोजित कार्यक्रम आखला असून, विविध संस्था व लोकसहभाग यांचे नियोजन करण्याचे प्रस्तावित आहे. स्वच्छ भारत अभियान सन २०२४-२५ अंतर्गत चतुरूसूत्राप्रमाणे शून्य कचरा निर्मितीवर भर देण्यात येणार आहे. यानुसार प्रथम प्रत्येक झोनमधील एक प्रभाग शून्य कचरा निर्मितीसाठी निवडण्याचे ठरविण्यात येणार असून, प्रभागातील सर्व सामाजिक संस्था व अशासकीय संस्था यांचा 'सामुदायिक सामाजिक जबाबदारी' (Corporate Social Responsibility) या तत्त्वावर सहभाग घेण्यात येईल. तसेच शहरातील सर्व मोठ्या फ्लॅट स्कीममध्ये चतुरूसूत्री तत्त्वावर शून्य कचरा निर्मिती प्रक्रिया राबविण्याचा मानस आहे.

प्रत्येक झोन वर कचरा हस्तांतरण केंद्र उभारण्यात येईल तसेच दैनंदिन कचरा संकलन अधिक नियोजन पद्धतीने कसे होईल ह्या साठी विशेष लक्ष देऊन ते सुधारण्यात येईल तसेच रस्त्यावरील कचरा उचलण्याचा अवधी कमी करण्यात येईल.

कचरा संकलनावर विशेष भर देण्यात येईल, ज्यामध्ये ओला कचरा, सुका कचरा आणि घातक (हानीकारक) कचरा यांचे स्त्रोतावरच वर्गीकरण बंधनकारक केले जाईल.वर्गीकृत कचरा 'स्वच्छ शहराची गुरुकिल्ली' या तत्त्वावर प्रत्येक नागरिकाचा सहभाग सुनिश्चित केला जाईल.

शहरातील तलाव व नद्या प्रदूषित होऊ नयेत, याकरिता गणेशोत्सव, दुर्गोत्सव तसेच इतर उत्सवांदरम्यान मूर्ती विसर्जन तलाव/नद्यांमध्ये प्रतिबंधित करण्यात आलेले असून, भाविकांसाठी मूर्ती विसर्जनाकरिता कृत्रिम तलावांची व्यवस्था करण्यात येते. सन २०२५ गणेशोत्सवामध्ये POP मूर्तींवर

बंदी घालण्यात आलेली असून, ९५% मातीच्या मूर्ती भाविकांद्वारे स्थापित करून महानगरपालिकेच्या प्रदूषणमुक्ती अभियानामध्ये मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला आहे.

पशुवैद्यकीय विभागांतर्गत मोकाट श्वानांच्या बंदोबस्ताकरिता दहा वाहने खरेदी करण्यात आलेली आहेत. त्यासोबत भांडेवाडी येथील तात्पुरते उभारलेले पशुनिवारा केंद्र सर्व सुविधायुक्त व अद्ययावत करण्याचे प्रस्तावित आहे. मोकाट श्वानांच्या संख्येवर नियंत्रण आणण्यासाठी नसबंदी शस्त्रक्रिया कार्यक्रम राबविण्याकरिता एजन्सीची नेमणूक करण्यात आलेली आहे व रेबीज आजारावर प्रतिबंध घालण्यासाठी शहरातील मोकाट श्वानांचे अँटीरेबीज लसीकरणाचे काम सुरू आहे. या कामात गती व अधिक यश मिळविण्यासाठी एनजीओची मदत घेवून यांस मार्गी लावण्याचा आमचा प्रयत्न राहील.

शहरातील मोकाट जनावरांमुळे वाहतुकीला होणारा अडथळा लक्षात घेता, नागरी भागातील जनावरांचे गोठे नागरी वस्तीबाहेर स्थानांतरित करण्याकरिता प्रस्तावित नंदग्राम प्रकल्पाकरिता शासनाकडून १०४ कोटी निधीची तरतूद उपलब्ध झालेली असून, या कामाकरिता प्रकल्प सल्लागार /कंत्राटदार यांची नियुक्ती करण्यात आली असून चालू वर्षी नंदग्राम प्रकल्पाला गती देऊन सदर प्रकल्प पूर्णत्वास नेण्याचा मानस आहे.

मृत जनावरांची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी भांडेवाडी येथे Animal Crematorium स्थापित करण्यात आलेले आहे.

'ब्लॅकस्पॉट फ्री' नागपूर

नागपूर शहरात ६४१ ब्लॅकस्पॉट येथे नागरिक कचरा टाकतात, येथे मेटलचा QR code चा बोर्ड लावण्यात येईल. सामान्य नागरिकांना या ब्लॅकस्पॉटवर कचरा आढळल्यास तो स्कॅन करून तक्रार करतील जेणेकरून म.न.पा.च्या विभागाद्वारे तात्काळ कारवाई करून नागपूरास ब्लॅकस्पॉट फ्री करण्याचा दृष्टीकोन साध्य करता येईल. आरोग्य (स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापन) विभागासाठी सन २०२६-२७ मध्ये महसुली व भांडवली मिळून एकत्रित रू. ११०.६० कोटी तरतूद प्रस्तावित आहे.

'पैसे द्या व वापरा' तत्वावरील सार्वजनिक शौचालये निर्माण करणे आणि स्वच्छ भारत अभियान.

महापौरांच्या विशेष प्रयत्नांतून मनपा च्या अमृत महोत्सवी वर्षात ७५ महिलांसाठी स्मार्ट विशेष शौचालये बनवण्यात येतील. त्या साठी ४ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तसेच परिवहन विभागाकडे ज्या जुन्या बसेस आहेत तसेच खाजगी वाहन हयांचे रूपांतर स्मार्ट टायलेट मध्ये करण्याचा आमचा मानस आहे.

शहराच्या वाढत्या लोकसंख्येमुळे सार्वजनिक ठिकाणी तसेच बाजारांच्या ठिकाणी 'पैसे द्या व वापरा' तत्वावरील सार्वजनिक शौचालये निर्माण करणे आवश्यक बाब झालेली आहे. ह्या योजनेअंतर्गत मा. महापौरांनी ही योजना घोषीत केली होती. यावर्षी त्याची अंमलबजावनी करण्याच्या दृष्टिने रू. १७.०० कोटी या अर्थसंकल्पात प्रस्तावित केले आहे.

Urban Poverty Allivatiion and Social Welfare
शहरी गरीबी निर्मुलन व समाजसेवा

मागासवर्गीय कल्याण विशेष समिती अंतर्गत दुर्बल घटक योजना राबविणे

नागपूर शहराच्या एकूण लोकसंख्येच्या सुमारे ३३ टक्के वस्त्या स्लम वस्त्यांमध्ये वसलेल्या आहेत. येथील नागरिकांचे राहणीमान उंचावण्यासाठी स्लम वस्त्यांमध्ये मूलभूत सुविधा पुरविणे व विकासकामे करणे तसेच शासनाच्या विविध योजना राबविणे यावर महानगरपालिका भर देत असून त्यासाठी नियोजन करण्यात येत आहे. महानगरपालिका आपल्या अंदाजपत्रकात याकरिता आर्थिक तरतूद करत असते.

नागपूर महानगरपालिका अंतर्गत नागपूर शहरातील दुर्बल घटक तथा झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या नागरीकांना विविध मुलभूत सुविधा पुरविण्यात येतात. महानगरपालिकेच्या एकूण स्वत:चे उत्पन्नामधून बांधील खर्च वगळून ५ टक्के निधी दुर्बल घटक / झोपडपट्ट्यांमध्ये राहणारे मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजनेसाठी दरवर्षीच्या आय-व्यय अंदाजपत्रकात तरतुद करण्यात येत आहे. यातून या भागात मुलभूत सुविधा पुरविण्याची कामे हाती घेण्यात येतात. म.न.पा.चे स्वत:चे उत्पन्नावर ५ टक्के निधी रु. १६.५४ कोटीची गणना केल्यावर एवढा निधी उपलब्ध होतो म्हणून या अर्थसंकल्पात एकूण रु. २१२ कोटीची तरतुद उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

नागपूर शहरातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांसाठी 'रमाई घरकुल योजना'

महाराष्ट्र शासनाच्या विशेष जिल्हा समाज कल्याण विभागाची 'नागपूर शहरातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांसाठी असलेली रमाई घरकुल योजना' ही क्रियान्वयन एजन्सी म्हणून नागपूर महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येत असून चालू आर्थिक वर्षात जवळपास १५८७ नवीन लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देण्यात आला आहे.

दि. २३.०२.२०२६ ते दि. २७.०२.२०२६ दरम्यान रमाई घरकुल योजनेचा प्रचार व प्रसार करण्याच्या अनुषंगाने महानगरपालिकेद्वारे झोननिहाय शिबिरांचे आयोजन करण्यात आले. यात जवळपास २५०० नवबौद्ध व अनुसूचित जातीच्या घटकांकडून घरकुलाकरिता अर्ज प्राप्त होण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सन २०२५-२६ मध्ये २००० नवीन घरकुल बांधण्याचे उद्दिष्ट देण्यात आलेले आहे. सन २०२५-२६ मध्ये १५८७ बांधकामे पूर्ण झाली असून यात सन २०२४-२५ मधील ४८२ उर्वरित बांधकामांचा समावेश आहे. सन २०२६-२७ मध्ये रू. ३०.०० कोटी प्रस्तावित असून जास्तीत जास्त घरकुल बांधण्याचा मानस आहे.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना

१०० टक्के शासकीय अनुदान अंतर्गत मा. आमदारांनी सुचविल्यानुसार दलित वस्तीत विकासकामे केली जातात. सन २०२५-२६ मध्ये वितरित नियतव्यय रु. ७०००.०० लाख असून सदर नियतव्ययान्वये निविदा बोलविण्यात आलेल्या असून खर्च रु. ३२५४.०६ लाख इतका झालेला आहे. उर्वरित राशीची कामे प्रगतीपथावर आहेत. सन २०२६-२७ करिता रु. ९०.०० कोटीची तरतुद करण्यात आलेली आहे.

प्रधानमंत्री आवास योजना (घरकुल योजना)

प्रधानमंत्री आवास योजना घटक क्र. ३ (AHP) अंतर्गत मौजा बांजरा, ख. क्र. २४/४, २४/६ येथील १४१६४ चौ.मी. भूखंडावर परवडणारी घरकुले (AHP) अंतर्गत ४८० EWS सदनिकांचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे. सदर प्रकल्पांतर्गत S+7 च्या आठ इमारती असून इमारतींची जमिनीची सुधारणा, रस्ते, बाहेरील विजपुरवठा, संरक्षण भिंत, गेट, सांस्कृतिक सभागृह, पिण्याच्या पाण्याची सोय, पावसाळी पाण्याचे संवर्धन, सौरऊर्जेवर गरम पाण्याची सोय, मलनिस्सारण योजना, सांडपाणी वाहिका, लिफ्ट, सार्वजनिक सभागृह इत्यादी घटकांचा समावेश आहे. सदर प्रकल्पाकरिता मनपातर्फे रु. १/- प्रति चौ.मी. या नाममात्र दरावर जमीन उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

सदर प्रकल्प हा अल्प उत्पन्न गटातील (EWS) लोकांसाठी असून ३०.०० चौ.मी. सदनिकेची किंमत ११.५२ लाख आहे. त्यामधील २.५० लाख रुपये केंद्र शासन व राज्य शासनाचा निधी असून रु. ९.०२ लाख राशीत नागरिकांना सदनिका उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

तसेच गट क्रमांक ४ BLC अंतर्गत ८३२ घरकुलांचे बांधकाम पूर्ण करण्यात आलेले आहे.

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) - २.०

केंद्रशासनाने दि. ०१/०९/२०२४ पासून सदर योजना घोषित केलेली असून दि.१५/१०/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य सरकारने राज्यात लागू केलेली आहे. मनपाच्या दि. ०४/०१/२०२५ रोजीच्या ठराव क्र. ११६ नुसार सदर योजना नागपूर शहराकरिता राबविण्यास सुरुवात करण्यात आलेली आहे.

सदर योजनेअंतर्गत घरकुल मागणी सर्वेक्षण केंद्र शासनाच्या ऑनलाईन वेब पोर्टलवर सुरू केले असून ऑनलाईन अर्ज सादर करण्याकरिता नागरिकांमध्ये जागृती निर्माण करण्याच्या हेतूने मोठ्या प्रमाणात जाहिरात व प्रसिद्धी मनपातर्फे करण्यात आलेली आहे.

सदर योजनेतील घटक क्र. २ (AHP) परवडणारी घरे अंतर्गत ज्या नागरिकांकडे स्वतःची जागा व पक्के घर नाही अशा नागरिकांकरिता कमी किमतीत घरे उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेद्वारे -

- मौजा नारी, ख. क्र. ११३/१३ व ९६/४ या मनपाच्या जागेवर १ BHK २१० व २ BHK ३०८ सदनिका याप्रमाणे एकूण ५१८ EWS सदनिकांचा प्रकल्प मंजूर असून प्रकल्प विकासकाची निवड करण्यात आलेली आहे. तसेच सदर प्रकल्पातील सदनिकांकरिता नागरिकांकडून ऑनलाईन अर्ज सुद्धा मागविणे सुरू आहे.
- मौजा पुनापुर येथे 840 1 BHK सदनिकांचा प्रकल्प तसेच मौजा हुडकेश्वर येथील २४० सदनिकांचा प्रकल्प प्रस्तावित असून सदर प्रकल्पास केंद्र शासनाद्वारे मंजुरी प्रदान केलेली आहे.

तसेच मौजा जयताळा येथे ५७१ EWS सदनिका प्रकल्प अहवाल शासन मंजुरीसाठी सादर करण्यात आलेला असून मौजा बोरगाव येथे अंदाजे ४५० EWS सदनिकांचा प्रकल्प प्रस्तावित आहे.

घटक क्र. १ BLC अंतर्गत एकूण ४५८ लाभार्थ्यांच्या प्रस्तावास शासनाद्वारे मंजुरी प्राप्त असून टप्पेनिहाय बांधकामानुसार अनुदान वितरित करण्यात येत आहे.

समाज कल्याण विभाग

भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना भाग - १० अंतर्गत कार्यरत महिलांकरिता वसतिगृह प्रकल्प

'भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना' या महत्त्वाकांक्षी केंद्र शासनाच्या योजनेअंतर्गत भाग-१० मध्ये प्रस्तावित कार्यरत महिलांकरिता वसतिगृह बांधकाम प्रकल्पाबाबत

महिलांचे सक्षमीकरण, सुरक्षित निवास आणि कार्यरत महिलांना शहरात सन्मानाने व सुरक्षित वातावरणात राहण्याची सुविधा उपलब्ध करून देणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे.वाढत्या शहरीकरणाच्या पार्श्वभूमीवर नागपूरसारख्या वेगाने विकसित होणाऱ्या शहरात अशा वसतिगृहांची आवश्यकता प्रकर्षाने जाणवते.

या योजनेअंतर्गत ऑरेंज सिटी स्ट्रीट प्रकल्पामधील अभिन्यासातील ॲमेनिटी स्पेस क्र. ५ या भूखंडावर वसतिगृह उभारण्याचा प्रस्ताव महानगरपालिकेतर्फे सादर करण्यात आला आहे. संबंधित भूखंडाचे एकूण क्षेत्रफळ ९१३३.०३७ चौ.मी. असून त्यापैकी ६३८०.४८ चौ.मी.क्षेत्र महिला वसतिगृहाकरिता प्रस्तावित करण्यात आले आहे.

प्रस्तावित इमारतीमध्ये:

- तळमजला (२२१७.६७ चौ.मी.) - वाहनतळ, डायनिंग एरिया, किचन, वेटिंग रूम, कार्यालय, लॉन्ड्री रूम व इतर उपयुक्त सुविधा
- प्रथम मजला (१९९६.९१ चौ.मी.) - वेटिंग रूम, स्वतंत्र रूम्स व डॉर्मेटरीज
- द्वितीय मजला (२१६५.९१ चौ.मी.) - वेटिंग रूम, रूम्स व डॉर्मेटरीज

एकूण बांधकामामध्ये १२० महिलांसाठी राहण्याची सुविधा (Beds) उपलब्ध करून देण्यात येणार आहे.हा प्रकल्प केवळ निवासापुरता मर्यादित नसून सुरक्षितता, स्वच्छता आणि मूलभूत सुविधा यांचा समावेश असलेला समग्र उपक्रम आहे.

केंद्र शासनाच्या 'भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना २०२४-२५' अंतर्गत पत्र क्र. F- No- 44(I)/PF&S/2025&26 (CAPEX) & Maharashtra दिनांक १२ सप्टेंबर २०२५ अन्वये या प्रकल्पासाठी रू. २४.४६ कोटी निधी मंजूर करण्यात आला आहे.

तसेच मनपा ठराव क्र. ११६/स्थायी समिती/प्रशासक दिनांक १३/०६/२०२५ अन्वये एकूण रू ३०,४४,६८,७५६/- रकमेची प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. केंद्र शासनाकडून मंजूर झालेल्या रकमेव्यतिरिक्त उर्वरित रू. ५,९८,६८,७५६/- निधी मनपा पद क्र.A28901341002/ २०२५-२६ (नाविन्यपूर्ण संकल्पनेतून नागरी सुविधा) अंतर्गत उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

हा प्रकल्प महिलांच्या सुरक्षित निवासाच्या दृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल आहे. शहरात रोजगारासाठी येणाऱ्या महिलांना परवडणारी, सुरक्षित व सुसज्ज निवास व्यवस्था उपलब्ध होणार असून त्यांच्या सामाजिक व आर्थिक प्रगतीला चालना मिळेल.

महानगरपालिका महिलांच्या सक्षमीकरणासाठी व सुरक्षित नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कटिबद्ध आहे.या प्रकल्पाच्या यशस्वी व वेळेत पूर्णतेसाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करणे अपेक्षित आहे.

सदर काम प्रगतीपथावर असून लवकरात लवकर पुर्ण करण्याच्या मनपाचा मानस आहे.

महिला व बाल विकास योजना

महिला उद्योजिका मेळावा, महिला दिन, महिला तक्रार समिती अशा सर्व योजना मागील अनेक वर्षापासून सुरळीतपणे सुरु आहे. या आर्थिक वर्षात नागपूर महानगर पालिकेच्या शाळेतील मुलींना सॅनेटरी पॅड उपलब्ध करून देण्याचा या स्थायी समितीचा संकल्प आहे . याकरीता अर्थसकल्पात योग्य ती राशीची तरतूद करण्यात आलेली आहे.

समाज कल्याण विभागाच्या अंतर्गत खालीलप्रमाणे योजना राबविण्यात येणार आहे.

- स्वर्गीय अनुसयाबाई काळे स्मृती महिला समुपदेशन केंद्र : शहरातील महिला व बालकांवर होणाऱ्या अत्याचाराला प्रतिबंध घालण्यासाठी आणि कौटुंबिक कलह मिटविण्यासाठी समुपदेशन केंद्र झोननिहाय सुरू आहे. दि. ०१/०४/२०२५ ते दि. ३०/११/२०२५ पर्यंत अशा प्रकारच्या ७६६ प्रकरणांची नोंद घेण्यात आली असून लाभार्थ्यांनी समुपदेशनाचा लाभ घेतलेला आहे.
- शिवणयंत्र वाटप योजना : अल्प उत्पन्न गटातील गरीब, गरजू, विधवा, परित्यक्ता महिलांना रोजगार मिळावा या हेतूने DBT तत्त्वावर ही योजना राबविली जाते. त्या अनुषंगाने सन २०२५-२०२६ चे लाभार्थी ९८ आहेत.

- शिवणयंत्र क्लस्टर्स : अंतर्गत सोनचिरैया वस्तू विक्री केंद्र सिताबर्डी, शिवणयंत्र क्लस्टर्स पुणापूर, पारडी, नागपूर, तसेच गंजीपेठ शाळा, नागपूर शिवणयंत्र क्लस्टर्स येथे महिलांना रोजगारनिर्मिती अंतर्गत क्लस्टर्स सुरू आहेत. आतापर्यंत ५७ महिलांना शिवणयंत्र प्रशिक्षण देण्यात येत आहे.
- लाडली लक्ष्मी विमा योजना : दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील नवजात बालिकांना त्यांच्या भविष्यासाठी आर्थिक तरतूद करण्याच्या दृष्टीने या योजनेअंतर्गत 'जीवन तरुण विमा' व 'जीवन किशोर विमा' या दोन L.I.C. Plan द्वारा एकूण ५८३५ लाभार्थ्यांचे विमा संरक्षण करण्यात आले असून, सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात नूतनीकरण विमा हप्ता रु. २.०० कोटी भरण्यात येत आहे. आर्थिक वर्ष २०२६-२७ करीता योग्य ती तरतुद अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे.
- दि. ८ मार्च रोजी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिलांचे हक्क व महिलाविषयक असलेल्या शासनाच्या योजनांविषयी व मनपाच्या योजनांविषयी तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात येते.
- दि. १ ऑक्टोबर रोजी जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन साजरा करण्यात येतो, याकरिता सन २०२५-२६ मध्ये झालेला खर्च रु. २.४४ लक्ष आहे.
- दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानांतर्गत 'शहरी बेघर निवारा' या उपांगांतर्गत ५ बेघर निवारे सुरू असून २ भिक्षेकरी गृहे आहेत. सदर दोन्ही निवाऱ्यांत अनुक्रमे २५० व २०० बेघर व भिक्षेकरी लाभार्थी क्षमता आहे. सद्यस्थितीत ४१२ लाभार्थी लाभ घेत आहेत. सदर निवाऱ्यांत रस्त्यावर झोपणारे बेघर तसेच त्यांना स्वावलंबी बनवून मुख्य प्रवाहात आणणे, कुटुंबाची भेट घडवून देणे, आरोग्य तपासणी करणे इत्यादी सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.
- स्वयंरोजगार उपांगांतर्गत ६५ लाभार्थ्यांच्या अर्जापैकी ६५ अर्ज पारित झाले असून रु. ५९.०९ लक्ष कर्ज वाटप करण्यात आले आहे. तसेच ११० बचत गटांना २३.९० लक्ष कर्ज वाटप करण्यात आले आहे.

समाज कल्याण योजनेअंतर्गत विविध पदांमध्ये यावर्षात योग्य ती राशी या अर्थसंकल्पात ठेवण्यात आली आहे.

पंडीत दिनदयाल अंत्योदय योजना

नागपूर महानगरपालिकेमार्फत दिव्यांगांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती

- कर्णबधिर दिव्यांगांना (Cochlear Implant) शस्त्रक्रियेकरिता अर्थसहाय्य योजना : या योजनेंतर्गत या आर्थिक वर्षात प्रत्येक लाभार्थी ६ लक्ष प्रमाणे २० लाभार्थ्यांकरिता १२० लक्ष

उपलब्ध करून देण्यात आले आहे. सदर योजना वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांच्यामार्फत राबविण्यात येत आहे व आतापर्यंत ०८ लाभार्थ्यांना योजनेंतर्गत लाभ देण्यात आलेला आहे.

दिव्यांगांना वैयक्तिक स्वयंरोजगाराकरिता, दिव्यांग बचत गटांना स्वयंरोजगाराकरिता अर्थसहाय्य योजना

- या योजनेंतर्गत १४४ दिव्यांग लाभार्थ्यांना (दुसरा टप्पा) रु. ५०,०००/- प्रमाणे एकूण रु. ७२.०० लक्ष अनुदान देण्यात आले आहे.
- तसेच १५५ दिव्यांग लाभार्थ्यांना (पहिला टप्पा) रु. ४५,०००/- प्रमाणे रु. ६९.७५ लक्ष अनुदान देण्यात आले आहे. झालेला खर्च रु. १४१.७५ लक्ष आहे.
- वरील १५५ दिव्यांग लाभार्थ्यांना (दुसरा टप्पा) रु. ५०,०००/- प्रमाणे रु. ७७.५० लक्ष अनुदान मौका चौकशीनंतर देण्यात येईल.
- सद्यस्थितीत १०५ दिव्यांग लाभार्थ्यांच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्राप्त असून त्यांना (पहिला टप्पा) रु. ४५,०००/- प्रमाणे एकूण रक्कम रु. ४७.२५ लक्ष खर्च अपेक्षित आहे.
- तसेच विभागात पुनश्च ६० दिव्यांग लाभार्थ्यांच्या प्रस्तावास (पहिला टप्पा) रु. ४५,०००/- प्रमाणे एकूण २७.०० लक्ष खर्च अपेक्षित आहे.
- या आर्थिक वर्षात दिव्यागांना पंतप्रधान आवास योजनेत पात्र दिव्यांगांना म.न.पा.द्वारे अर्थसहाय्य रू. २ लक्ष प्रति दिव्यांग देण्यात येईल.

मतिमंद घटकातील दिव्यांगांना निर्वाह भत्ता योजना

या योजनेअंतर्गत मतिमंद घटकातील लाभार्थ्यांना प्रतिमहा रु. ५००/- देण्यात येतात. ठरावानुसार या आर्थिक वर्षात १००० लाभार्थ्यांना लाभ देणे आहे. त्या अनुषंगाने या योजनेचा पूर्णतः १००० लाभार्थ्यांनी लाभ घेतलेला आहे.

दिव्यांगांना सहाय्यभूत साधने व तंत्रज्ञान याकरिता अर्थसहाय्य योजना

या योजनेमध्ये दिव्यांगांना साहित्य साधने खरेदी करून व्यवसाय करण्याकरिता रु. ६०,०००/- अनुदान देण्यात येते. या योजनेंतर्गत अद्याप ०४ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आलेला असून रु. २.४० लक्ष खर्च करण्यात आला आहे.

०३ लाभार्थ्यांना वस्तू खरेदीकरिता पत्र देण्यात आले आहे, ०२ लाभार्थ्यांनी अद्याप वस्तू खरेदी केली नाही.

याव्यतिरिक्त ०२ लाभार्थ्यांच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्राप्त असून साहित्य खरेदीकरिता संबंधितास कळविण्यात आले आहे. वस्तू खरेदीनंतर मोका चौकशीअंती DBT अंतर्गत अनुदान देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

प्रधानमंत्री आवास योजना घटक क्र. ३ (परवडणारी घरकुले)

अंतर्गत नासुप्र, म्हाडा व मनपातर्फे बांधण्यात आलेल्या व बांधण्यात येत असलेल्या मनपा हद्दीतील बांधकामाकरिता सोडत पद्धतीने निवड झालेल्या दिव्यांग लाभार्थ्यांना शासन अनुदान रु. २.५ लक्ष सह रु. ५०,०००/- महानगरपालिकेकडून (आर्थिकदृष्ट्या दुर्बल) अर्थसहाय्य योजना.

या योजनेंतर्गत ०५ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला असून याकरिता रु. २.५० लक्ष खर्च झालेला आहे.

०१ लाभार्थ्यांच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता असून देयक काढण्याची पुढील कार्यवाही विभागाकडून सुरू आहे. कार्यकारी अभियंता (प्र.आ.यो.) यांकडून एकूण १८ लाभार्थ्यांचे प्रस्ताव विभागास प्राप्त झाले आहेत. त्यापैकी १२ लाभार्थ्यांना मान्यता प्राप्त आहे. उर्वरित ०२ लाभार्थ्यांची कागदपत्र पूर्तता प्रक्रिया सुरू आहे व ०४ लाभार्थी अपात्र ठरले आहेत.

राज्यस्तरीय, राष्ट्रीयस्तरीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये

सहभागी होणाऱ्या दिव्यांग खेळाडूंना आर्थिक सहाय्य योजनेंतर्गत १७ खेळाडूंना योजनेचा लाभ दिला असून रु. ६.४५ लक्ष खर्च झालेला आहे. क्रीडा अधिकारी यांकडून ०९ पात्र लाभार्थ्यांची विभागास प्राप्त यादी अंतिम मंजुरीकरिता प्रस्ताव पाठविण्यात आले आहेत.

अंत्योदय ई-रिक्षा वाटप योजना

या योजनेंतर्गत अद्याप ०९ लाभार्थ्यांना योजनेचा लाभ दिला असून रु. ९.०० लक्ष खर्च झालेला आहे. १३ लाभार्थ्यांचे प्रस्ताव मान्यतेसाठी पाठविण्यात आले आहेत.

तसेच १९ लाभार्थ्यांच्या मंजूर प्रस्तावास योजनेचा लाभ देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

नागपूर मनपा, DDRC व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या योजना (अनु क्र. ८ ते ११)

राजमाता जिजाऊ अर्थसहाय्य योजना

सदरची योजना नागपूर शहरातील दिव्यांग बालकांसाठी त्यांच्या मातांना अर्थसहाय्य प्रोत्साहन भत्ता देण्याची योजना असून जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्रामार्फत राबविली जात आहे, त्याकरिता समाज विकास विभाग मनपातर्फे २२ लक्ष निधी उपलब्ध करून दिला जातो.

संजय गांधी निराधार अनुदान योजना

नागपूर शहरी क्षेत्रातील दिव्यांग व्यक्तींना योजनेचा लाभ विशेष नोंदणी कक्षाच्या माध्यमातून देण्यात येतो.

ऑनलाईन दिव्यांग प्रमाणपत्र आणि वैश्विक ओळखपत्र (UDID) वितरण कार्यक्रम

शहरी भागातील दिव्यांग व्यक्तींना स्वावलंबन प्रणालीद्वारे ऑनलाईन दिव्यांग प्रमाणपत्र आणि वैश्विक ओळखपत्र (UDID) वितरण केले जाते.

१) दिव्यांग निरामय आरोग्य विमा योजना

२) दिव्यांग फिजिओथेरेपी केंद्र

३) दिव्यांगांचे क्रीडा स्पर्धा आयोजन (क्रीडा विभागाकडून दिव्यांग क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात येतात.)

४) दिव्यांग स्किल डेव्हलपमेंट ट्रेनिंग

५) दिव्यांग ऑर्केस्ट्रा कार्यक्रम

६) दिव्यांगांना रोजगार प्रशिक्षण (EDP TRAINING)

आस्था भिक्षेकरी निवारागृह : नागपूर महानगरपालिकेअंतर्गत आस्था भिक्षेकरी पुनर्वसन प्रकल्प एप्रिल २०२२ मध्ये सुरू करण्यात आलेला आहे. सदर निवारागृहाची क्षमता १५० व्यक्तींची आहे. यामध्ये भिक्षेकऱ्यांना पुन्हा सन्मानाने जगण्यासाठी योगा, कौशल्य विकास, व्यसनमुक्ती, रोजगार, नियमित आरोग्य तपासणी, मानसिक आजार, स्वयंरोजगार, परिवार पुनर्मिलन आदी लाभ देण्यात येत आहेत. सद्यस्थितीत निवाऱ्यात उपलब्ध लाभार्थ्यांपैकी ४९४ लाभार्थ्यांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आला व ६९४ भिक्षेकऱ्यांना परिवार मिलन करून घरवापसी करण्यात आली. तसेच लाभार्थ्यांना मतदान कार्ड, आधार कार्ड, बँक खाते काढून देण्यात आले आहे.

महिला भिक्षेकरी निवारागृह

सद्यस्थितीत केंद्र शासनाच्या SMILE प्रकल्पाअंतर्गत महिला भिक्षेकऱ्यांकरिता ५० क्षमतेचे निवारागृह सुरू करण्यात आले आहे. २२ महिलांचे परिवार मिलन करण्यात आले आहे व १० महिलांना कौशल्य प्रशिक्षणाच्या माध्यमातून CRAFT & SOFT TOYS तयार करणे शिकविले जाते.

पंतप्रधान पथविक्रेता स्वावलंबी निधी योजना (PM SVANidhi) : प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजनेकरिता एकूण ९८,५३९ पथविक्रेत्यांनी अर्ज सादर केले आहेत. सदर अर्जांपैकी बँकेमार्फत ८९,४२३ पथविक्रेत्यांना रु. १३१.४६ कोटी कर्ज स्वरूपात वितरित करण्यात आले आहे.

कर्ज वितरित लाभार्थ्यांना रु. ३.५१ कोटी इतके व्याज अनुदान व रु. ३.८४ कोटी कॅशबॅक प्राप्त झाले आहेत.

सोनचिरैया शहरी उपजीविका केंद्र

सोनचिरैया शहरी उपजीविका केंद्रासोबत २०० बचत गट संलग्न असून, २,००० सदस्य जोडलेले आहेत. सदर केंद्रामार्फत नागरी सुविधा केंद्राच्या माध्यमातून विविध योजनांकरिता लाभार्थ्यांचे कमी दरावर अर्ज भरण्यात येतात. सोनचिरैया शहरी उपजीविका केंद्राअंतर्गत रोजगार उपलब्ध करून देण्याकरिता नोंदणी करणे, स्वयंसहाय्यता बचत गटातील महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तूंचे विक्री प्रदर्शन मेळावे आयोजित करणे, शिवणकाम युनिट तसेच सोनचिरैया शहरी उपजीविका केंद्राअंतर्गत नागपूर जिल्ह्यातील तसेच महाराष्ट्रातील स्वयंसहाय्यता समूहातील महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तू विक्री करण्याच्या उद्देशाने शॉपिंग मॉल सुरू करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुली व महिलांना रोजगार व स्वयंरोजगार उपलब्ध होण्याकरिता ३० मुलींना 'ड्रोन सर्व्हिस टेक्निशियन' या विषयात विदर्भ डिफेन्स असोसिएशन वाडी, नागपूर येथे प्रशिक्षण देण्यात येत आहे.उपरोक्त सर्व योजना राबविण्यासाठी समाज कल्याण विभागासाठी सन २०२६-२७ मध्ये रू.३५.२५ कोटी तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

शहरातील ज्येष्ठ नागरिकांना सुविधा

यामध्ये जेष्ठ नागरिकांचे हेल्थ कॅम्प घेणे, ज्येष्ठ नागरिकांच्या सहली आयोजीत करणे, ज्येष्ठ नागरिकांमध्ये उत्साह निर्माण करण्यासाठी विविध प्रकारचे शिबीरांचे आयोजन करणे व ज्येष्ठ नागरिकांना आवश्यक सुविधा देणे. ही सर्व कामे एन.जी.ओ. व म.न.पा. यांचे संयुक्त विद्यमाने समाज कल्याण विभागाचे माध्यमतातून राबविण्यात याव्या. ज्येष्ठ नागरिकांच्या विविध कार्यासाठी प्रत्येक नगरसेवकांचे माध्यमातून खर्च करण्यासाठी रु. २ लक्ष निधी राखीव ठेवण्यात आला आहे. प्रत्येक नगरसेवकांनी प्रभागात ज्येष्ठ नागरिकांचे विभागाच्या माध्यमातुन गट निर्माण करावे व त्या गटांना वरील सुविधांचा लाभ द्यावा यामुळे ज्येष्ठ नागरिकातील नैराश्याची भावना दुर होऊन एक सुखद आयुष्य जगण्यास म.न.पा.च्या या प्रकल्पाव्दारे मदत होईल असा मला विश्वास आहे. यावर्षात योग्य ती राशी या अर्थसंकल्पात ठेवण्यात आली आहे.

माजी महापौर पुष्पाताई घोडे सायकल बँक योजना

महानगरपालिका क्षेत्रातील या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त ७५ प्रतिभावान व हुषार मुलींना या सायकल देण्यात येतील. त्यामुळे या विद्यार्थीनींना चालना मिळेल.

Public Education
लोकशिक्षण

शिक्षण विभाग

प्रती विधानसभा २ अश्या १२ शाळा पुनर्निर्माण करणार आहे. शासन आणि महानगर पालिका असे मिळून ते करणार असून म.न.पा द्वारे ३० कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

- शासनाने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सर्व शाळांमध्ये CCTV लावण्याबाबत निर्देशित केले आहे. त्या अनुषंगाने मनपाच्या सर्व शाळांमध्ये CCTV Camera System बसविण्यात येत आहे. याचे नियंत्रण संबंधित शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षणाधिकारी यांच्याकडे राहील, तसेच याचे पर्यवेक्षण Smart City Control Room येथून करण्यात येणार आहे. जेणेकरून शाळांमध्ये कोणत्याही प्रकारचे अघटित घडण्यापासून प्रतिबंध करता येऊ शकेल. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये CCTV स्थापित करण्याचे कार्य करण्यात आले असून, शाळांमध्ये लावण्यात आलेल्या प्रणालीच्या देखभाल-दुरुस्तीकरिता व अद्ययावतीकरणाकरिता योग्य ती तरतूद ठेवण्यात आली आहे.
- शासनामार्फत इयत्ता १ ते ८ च्या विद्यार्थ्यांना मध्यान्ह आहार पुरविण्यात येतो. या विद्यार्थ्यांसोबतच पूर्व प्राथमिक/बालवाडीच्या विद्यार्थ्यांना पोषक आहार उपलब्ध करून देण्यात येत आहे. यामध्ये शासनाने निश्चित केलेल्या मेनूप्रमाणे व पोषणमूल्यांप्रमाणे आहार देण्यात येत आहे.
- मनपा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्या क्रीडागुणांना, सांस्कृतिक, कला व बौद्धिक गुणांना वृद्धिंगत करण्याकरिता दरवर्षी माहे जानेवारीमध्ये 'शिक्षणोत्सव' कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. यामध्ये क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक स्पर्धा व बौद्धिक स्पर्धा आयोजित करून विजेता व उपविजेता यांचा गुणगौरव करण्यात येईल.
- नागपूर महानगरपालिका प्राथमिक शिक्षण देणे ही महानगरपालिकेची प्रमुख जबाबदारी असून, शहरामध्ये सद्यस्थितीत १०३ प्राथमिक व २९ माध्यमिक शाळा चालविण्यात येत आहेत. मागील कित्येक वर्षामध्ये पटसंख्येअभावी शाळा बंद पडलेल्या आहेत. अशा बंद पडलेल्या शाळांचे शालेय रेकॉर्ड नजीकच्या सममाध्यमाच्या म.न.पा. शाळेत स्थानांतरित करण्यात येते. शालेय रेकॉर्डमधील दाखल-खारिज रजिस्टर, शाळा सोडल्याचा दाखला, डिक्लेरेशन फॉर्म, निकालपत्र हे दस्तऐवज पडताळणी, जन्मतारीख, निवासाचा पुरावा इत्यादींकरिता विविध शासकीय कार्यालयांकडून मागविण्यात येतात. याकरिता नागरिक या दाखल्यांच्या दुय्यम प्रतींची मागणी करतात. रेकॉर्ड असणाऱ्या शाळांमध्ये अनेक शाळांचा मागील ५०-१०० वर्षांचा रेकॉर्ड उपलब्ध आहे. हा रेकॉर्ड मॅन्युअल पद्धतीने शोधताना संबंधित शाळेतील शिक्षकांना अत्यंत त्रास होतो,

तसेच वारंवार हाताळल्यामुळे हा रेकॉर्ड जीर्ण होतो व फाटतो. यामुळे या सर्व रेकॉर्डचे स्कॅनिंग करून डिजिटायझेशन, वर्षनिहाय / शाळानिहाय / नावनिहाय / जातनिहाय / वर्गनिहाय इंडेक्सिंग केल्यास तंत्रज्ञानाचा वापर करून आवश्यक असलेला रेकॉर्ड जतन करता येईल, तसेच शोधून तात्काळ उपलब्ध करून देता येईल. जुना रेकॉर्ड डिजिटायझेशन करत असतानाच सुरू असलेल्या शाळांमधील सद्यस्थितीतील रेकॉर्ड देखील नियमितपणे डिजिटायझेशन करणे आवश्यक आहे. शाळेत उपलब्ध साहित्य इत्यादी बाबींचा रेकॉर्ड आधुनिक पद्धतीने सॉफ्टवेअरच्या माध्यमातून हाताळणे व जतन करणे योग्य वाटते.

शिक्षण विभागासाठी सन २०२६-२७ मध्ये रू. ७१.२ कोटीची तरतूद प्रस्तावित आहे.

- आकांक्षा च्या धरती वर अजून काही संस्थांना जोडून उच्च दर्जाचे शिक्षण निशुल्क दारात शेवटच्या व्यक्ती पर्यंत पोहोचवण्याचा मानस आहे.
- अधिक च्या इंग्रजी शाळा, सेमी इंग्रजी अभ्यासक्रम हाताळण्याचा मानस आहे.
- सर्व महानगर पालिकेच्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश दिला जाईल.
- नागपूर महानगर पालिकेतील ७ वी ते १० वी सर्व विद्यार्थीनींना मोफत सेनिटरी पॅड वितरीत करण्याची योजना आखली जाईल. जेणेकरून मासिक पाळीच्या दरम्यान त्यांचे शाळेत न येण्याचे प्रमाण कमी होईल.
- विद्यार्थ्यांना दैनंदिन शिक्षणासोबतच आर्थिक शिक्षण

  लहान वयातच आर्थिक साक्षरता (Financial Literacy) विकसित होणे अत्यंत आवश्यक आहे. पैशाचे योग्य व्यवस्थापन, बचतीची सवय, गुंतवणुकीची प्राथमिक समज आणि जबाबदार खर्च यांसारख्या मूलभूत गोष्टी बालपणातच शिकवल्यास विद्यार्थ्यांची आर्थिक विचारसरणी अधिक सक्षम बनते. यासाठी शाळांमध्ये आर्थिक साक्षरतेविषयीचे शिक्षण समाविष्ट करण्यात येईल. प्रत्यक्ष उदाहरणे, उपक्रम आणि साध्या पद्धतींनी दिलेले हे शिक्षण विद्यार्थ्यांना भविष्यात सुजाण, आत्मनिर्भर आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम नागरिक बनण्यास मदत करेल.

ग्रंथालय विभाग

महानगरपालिकेद्वारे शहराच्या विविध भागांत ग्रंथालय व ई-ग्रंथालयाच्या सुविधा पुरविण्यात येत असून, या ग्रंथालयातील अभ्यासिका विभागांतर्गत UPSC, MPSC तसेच केंद्र व राज्य शासनाच्या विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झालेली असल्याने ग्रंथालय व त्यामधील सुविधा अपुऱ्या ठरत आहेत. त्यामुळे सध्या अस्तित्वात असलेल्या ग्रंथालयांच्या संख्येत वाढ करण्याचा महानगरपालिकेचा मानस असून, त्यादृष्टीने महानगरपालिकेद्वारे अत्याधुनिक व सुसज्ज ग्रंथालय व अभ्यासिकेचे नवीन बांधकाम व विस्तार करणे अत्यावश्यक झाले आहे.

किमान ६ चांगल्या नव्या इ - लायब्ररी आणि अभ्यासिका तयार करण्याचा मानस आहे.

जुन्या जीर्ण अवस्थेत असलेल्या समाज भवनात, जीर्णोद्धार करून इ लायब्ररी आणि विरंगुळा केंद्र बनवण्यात येईल. ज्याचा लाभ प्रामुख्याने ज्येष्ठ नागरिक घेऊ शकतील.

या सर्व बाबींचा विचार करता ग्रंथालय व अभ्यासिका इमारतीचे बांधकाम व विस्तार केल्यास स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना पुरेसे व दर्जेदार अभ्यासाचे वातावरण उपलब्ध होईल. ग्रंथालयाची क्षमता व उपयोगिता वाढेल. विद्यार्थ्यांना स्वयंअभ्यासासाठी सक्षम पायाभूत सुविधा मिळतील.

यानुसार बाजीराव साखरे ई-ग्रंथालय परिसरात चिल्ड्रन लायब्ररी निर्माण करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच झिंगाबाई टाकळी येथील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची तयारी करण्याकरिता म.न.पा.च्या बंद असलेल्या झिंगाबाई टाकळी शाळेत नवीन ग्रंथालय बांधण्याचे प्रस्तावित आहे.

याव्यतिरिक्त प्रोसेस सर्व्हेयर, स्वावलंबी नगर येथे पहिल्या मजल्याचे विस्तारीकरण व तुकाराम लांजेवार म.न.पा. शाळा येथे ई-ग्रंथालयाचे बांधकाम प्रस्तावित आहे. तसेच शहीद शंकर महल्ले शाळेत ई-ग्रंथालय बांधकाम, ठक्करग्राम येथे ई-ग्रंथालय बांधकाम, भुतेश्वर नगर येथील म.न.पा. लाल शाळेत वाचनालयाचे बांधकाम, कुणबीपुरा येथे रेणुकामाता ई-ग्रंथालयाचे निर्माणकार्य सुरू असून, याकरिता महाराष्ट्र शासनाद्वारे निधी प्राप्त झालेला आहे.

सदर कामे पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना योग्य व शांत अभ्यासाचे वातावरण उपलब्ध होऊन स्पर्धा परीक्षा व इतर परीक्षांमधील त्यांची गुणवत्ता व यशाचा टक्का वाढण्यास निश्चित मदत होईल.

ग्रंथालय विभागासाठी सन २०२६-२७ मध्ये रू. १८.०० कोटीची तरतूद प्रस्तावित आहे.

Urban Forestry and Enviromental Activities
शहरी वनीकरण व पर्यावरण संतुलन कार्यक्रम

सरोवरांचे पुनर्जीवन प्रकल्प

सोनेगाव व गांधीसागर तलावाचे मजबुतीकरण आणि सुशोभीकरण टिप्पणी

सोनेगाव तलावाची निविदा प्रक्रीया पूर्ण झाली असुन लवकरच कामाची सुरुवात होणार असुन अनुदानातुन प्राप्त झालेल्या राशीतुन हे कार्य होणार आहे. गांधीसागर तलावाचे मजबुतीकरण व सुशोभीकरण करण्यासाठी एकूण रू. ३१,५४,९२,१२७/- रूपये राशीची प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

रू. १८.०० कोटीपैकी रू. १२.०० कोटी निधी शासनाकडून प्राप्त आहे. सदर प्रकल्पात गाळ उपसा करणे, मजबुतीकरण व बळकटीकरणाचे काम करणे, पदपाथ करणे, कुंपणभिंत, मोबाईल शौचालय, जेटी व पुलाचे बांधकाम करणे, बहुउद्देशीय हॉलचे बांधकाम करणे, विद्युत विषयक कामे करणे, इत्यादि कामांचा समावेश आहे. प्रथम टप्याकरीता रु.३३.०० कोटी ची तरतुद या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.

अंबाझरी तलावाची स्वच्छता व मजबुतीकरण करणे

अंबाझरी तलावाची स्वच्छता व मजबुतीकरणाकरीता रू १० कोटी रुपयांची विशेष तरतूद करण्यात आलेली आहे. मा. महापौर आणि आमदार ह्यांची एक समिती बनवून शासन, लोकसहभागातून आणि महानगरपालिकेच्या विशेष प्रयत्नातून हे करण्यात येणार आहे. व याद्वारे अंबाझरी चे संवर्धन करण्यात येईल.

उद्यान निर्माण व सुधारणा

मागिल आर्थिक वर्षात जेवढी उद्याने अर्थसंकल्पात प्रस्तावित करण्यात आली होती त्यातील बऱ्याच उद्यानांची कामे पुर्ण झालेली असुन अपुर्ण राहीलेल्या उद्यानांचे कामे पुर्ण करण्याकरीता तसेच सुस्थिती, दुरुस्ती व प्रवर्तनासाठी योग्य तरतुद या अर्थसंकल्पात केली आहे.

मा. मुख्यमंत्री देवेन्द्रजी फडणवीस व केन्द्रीयमंत्री नितिनजी गडकरी यांच्या सूचनेनुसार २०० उद्यानाचा विकास करण्याचे सूचित केले आहे. त्यापैकी या आर्थिक वर्षात महानगरपालिकेच्या अमृत महोत्सवी वर्षामध्ये ७५ उद्यानाची नवनिर्मिती व जुन्या उद्यानांना सुस्थिती व दुरूस्ती करून अद्यावत करण्याचा आम्ही संकल्प हाती घेतलेला आहे. थीम बेस्ड उद्यानांतर्गत वेस्ट टू वंडर, बालोद्यान, ॲडव्हेचर पार्क, रॉक उद्यान, आयुर्वेदिक उद्यान, गणिती उद्यान, इत्यादि संकल्पनेवर उद्याने बनविण्यात येतील.

वरील सर्व उद्यानासाठी तसेच इतर उद्यानाच्या सुस्थिती, दुरूस्ती प्रवर्तन व निर्माणासाठी बांधील खर्चासहीत या अर्थसंकल्पात रू. ९५ कोटीची तरतुद केली आहे.

नाविन्यपूर्ण कल्पनेतून नागरी सुविधा

नागपूर शहरातील ऐतीहासीक स्मारक, नामांकीत स्थळे विविध प्रसिध्द चौकात अत्याधुनिक पध्दतीने प्रकाश व्यवस्था करून शहरातील वरील सर्व बाबी नागपूर शहरात येणाऱ्या पर्यटकांकरीता आकर्षणाच्या दृष्टिने शहराच्या सौंदर्यात भर पडावी यादृष्टीने कार्य करण्याचा स्थायी समितीचा मानस असुन याकरीता रू. १७ कोटीची तरतुद या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.

शहर परिवहन विभाग

शहराच्या बाहेर डेपो तयार करून कॉमन मोबिलीटी प्लान अंतर्गत, बाहेरून येणाऱ्या बसेस ह्या शहरात येणार नाही आणि त्यांना फिडर सेवा मनपा चे परिवहन विभाग देईल. ह्या द्वारे मनपाचे उत्पन्न वाढेलच, परिवहन विभागाला होणारी तुट कमी होईल, रोजगार निर्मिती होईल आणि तसेच जनतेला मोठ्या बसेसमुळे होणारा त्रास संपेल आणि वाहतुकीच्या कोंडी पासून जनता बाहेर येईल.

मोरभवन येथील बसस्थानकांचे B.O.T. तत्वावर विकास करण्याचा स्थायी समिती व परिवहन समितीचा मानस आहे. या बसस्थानकाचा विकास झाल्यावर प्रवाशांना अधिक सुविधा उपलब्ध होईल व शहरातील दळणवळणाचा त्रास कमी होईल व याद्वारे महानगर पालिकेचे कर उत्पादन वाढण्यास मदत

होईल, तसेच भविष्यात कोराडी, वाटोडा, हिंगणा, खापरी येथील बसडेपो अद्यावत व आधुनिक करण्याचा मानस आहे.

नागपूर महानगर हे सध्या बहुविध परिवहन सेवेचे केंद्र स्थान (Urban Transport Hub) बनलेले आहे. त्यामुळे या शहरात समानांतर बहुआयामी वाहतुक व्यवस्था निर्माण झालेल्या आहेत. परिणामी एकात्मिक शहर वाहतुक सेवा निर्माण करण्याची गरज निर्माण झालेली आहे.

नागपूर शहरातील व शहराच्या लगतच्या भागातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम, सुरक्षित, आरामदायक,पर्यावरणपूरक आणि परवडणारी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अत्यंत महत्त्वाची आहे.

शहरातील नागरिकांना परिवहन सेवेची आर्थिक सुविधा देणाऱ्या परिवहन विभागाच्या शहर बस ताफयात ३८५ ई-बसेस, डिझेल इंधनावर चालणाऱ्या १५० मिडी बसेस, ४५ मिनी बसेस अश्या एकूण ५८० बसेसचा संचलनामध्ये समावेश आहे. नागपूर शहरातील वाढती वाहनसंख्या त्यामुळे निर्माण होणारा रहदारीचा प्रश्न आणि होणारे प्रदूषण कमी होऊन जास्तीत जास्त नागरिकांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा लाभ घ्यावा याकरिता शहर बस सेवेमध्ये नव्याने अधिक ई-बसेस आणण्याचा महानगर पालिकेच्या प्रयत्ना अंतर्गत -

नागपूर शहरात शहर बस संचलनाचे वेळी पर्यावरण संर्वधन व्हावे म्हणुन मा. देवेन्द्रजी फडणविस मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी २५० स्टॅन्डर्ड वातानुकुलीत विद्युत बसेस खरेदी करण्यास रु. ५४.८० लक्ष प्रतिबस प्रमाणे एकूण रु. १३७ कोटी इतके अनुदान उपलब्ध करुन दिलेले आहे. या प्राप्त निधीतुन २५० स्टॅन्डर्ड वातानुकुलीत विद्युत बसेसचा पुरवठा करण्यात येत असून या २५० पैकी १०५ बसेस आजतागायत प्राप्त झाल्या आहेत. उर्वरित बसेस पुढील २ महिन्यात महानगरपालिकेच्या ताफ्यात दाखल होतील.

मा. नितीनजी गडकरी, केंद्रीय परिवहन मंत्री यांचे संकल्पनेतून नागपूर महानगरपालिकेला २५ आर्टिक्युलीटेड बसेसकरीता केंद्र सरकार कडून निधी प्राप्त होणार आहे. या प्रकल्पाकरिता निविदा प्रक्रिया विभागातर्फे पुर्ण करण्यात आल्या आहे. या बसेसचे संचालन आंतरिक रिंगरोड वरुन सुरु होणार असून या बसेसचे चार्जिंग शिघ्रगतीने बस थांब्यावर होईल. या बसेसमध्ये एका वेळी १३० प्रवासी प्रवास करु शकतील. सध्या केंद्र शासनाकडून मान्यता घेण्यासाठी नोव्हेंबर-२५ मध्ये प्रस्ताव सादर करण्यात आले आहे.

परिवहन समितीने यांनी अर्थसंकल्पीय अंदाज 'ब' महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ९८ (३) प्रमाणे स्थायी समिती समोर स्थायी समिती ठराव क्र. ४३ दि. २०/४/२०२६ प्रमाणे सादर केला आहे. या अंदाजपत्रकात मा. सभापती, परिवहन यांचे निवेदन व प्रस्तावित योजनांची माहिती जोडलेली आहे. त्याप्रमाणे अर्थसंकल्पीय अंदाज 'ब' ही स्थायी समिती म.न.पा. सभागृहासमोर अंतिम मंजूरी करीता सादर करीत आहे. परिवहन समितीने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम

३५९ आणि ३६० प्रमाणे कायदेशिर अंमलबजावणी करावी अशी शिफारस आहे. तसेच मा. सभागृहाला विनंती आहे दरवर्षी जेवढे अनुदान महानगरपालिका परिवहन विभागाला देते त्यापेक्षा जास्त अनुदान रू. १९०.०० कोटी देण्याचे या आर्थिक वर्षात स्थायी समितीच्या अर्थसंकल्पात प्रस्तावित केले आहे.

नागपूर पर्यटन विकास योजना

'पंच परिवर्तन' मधील 'स्व' परिवर्तनाच्या दृष्टीने पर्यटन हे एक प्रभावी माध्यम ठरू शकते. आपण नेहमी इतर शहरांमध्ये किंवा देशांमध्ये फिरायला जाण्याचा विचार करतो, पण त्याच वेळी आपल्या स्वतःच्या शहराकडे पर्यटकाच्या नजरेतून पाहण्याची गरज आहे. आपल्या शहरातील ऐतिहासिक स्थळे, सांस्कृतिक वारसा, मंदिरे, बगीचे आणि स्थानिक वैशिष्ट्ये जाणून घेतल्यास आपले स्वत्व अधिक ठळकपणे समोर येते.

'आपले शहर, आपली ओळख' या भावनेतून जर आपण आपल्या शहराचा अनुभव घेऊ लागलो, तर स्थानिक पर्यटनालाही चालना मिळेल आणि शहराच्या विकासाला हातभार लागेल. अशा प्रकारे स्वतःपासून सुरू होणारे हे छोटे परिवर्तन पुढे जाऊन मोठ्या सामाजिक बदलाचे रूप धारण करू शकते.

१०० चौकांमध्ये QR च्या माध्यमातून आपण ऑडीओ विजीयुल फिल्म उपलब्ध करून देऊ, जेणे करून त्या चौकासंबंधी माहिती पर्यटकांना आणि वाटसरूंना मिळेल. ह्या साठी विशेष तरतूद करण्यात आली आहे. तसेच देशभक्ती जागृत व्हावी ह्या साठी विशेष एलीडी च्या माध्यमातून देशभक्तीपर गीतांच्या ओळी सुद्धा लावण्यात येतील.

मारबत महोत्सव

जगात हा उत्सव केवळ नागपुरात होत असून, पर्यटन वाढविण्याच्या दृष्टीने ह्या साठी विशेष प्रयत्न मनपा द्वारे केले जातील आणि एक अभिनव आयोजन केले जाईल. पर्यटकांना बघण्यासाठी जागा, भोजन, मारबत महोत्सवासाठी प्रामुख्याने तयार करण्यात आलेले सोविनिअर दिले जातील ह्या साठी विशेष नियोजन या अर्थसंकल्पात केले आहे. ह्या महोत्सावाची ओळख जगाला व्हावी ह्या साठी विशेष प्रमोशन चे नियोजन सुद्धा केले गेले आहे. याद्वारे नागपूरात येणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढेल, रोजगार निर्मिती होईल, महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल आणि एकूणच नागपूर शहरातील अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. नागपूर जगाच्या पाठीवर येईल.

सावजी आणि बुनकर महोत्सव

नागपुरात सावजी भोजनाचे विशेष आकर्षण असून देशातून आणि परदेशातून पर्यटक येतात पण त्याचे अधिक महत्व वाढावे म्हणून एक ७ दिवसीय महोत्सव आयोजित करण्यात येईल, नागपूर बुनकर ही एक आपली परंपरा आहे त्याला ही गती देण्यासाठी ह्या महोत्सवात समावेश असेल, नागपूर बाहेरील पर्यटकांसाठी विशेष आकर्षण तयार करून देण्याचा मानस आहे.

हॉटेल ग्रेडेशन करण्यात येईल

नागपूर महानगरपालिका शहरातील हॉटेल्स व निवास व्यवस्थेचा दर्जा उंचावण्यासाठी एक व्यापक ग्रेडिंग व प्रमाणपत्र प्रणाली राबविणार आहे. या उपक्रमांतर्गत पाणीपुरवठा व बिल व्यवस्थापन, मालमत्ता कराची नियमितता, उपलब्ध पार्किंग सुविधा, स्वच्छता व देखभाल, इन्स्पेक्शन चेंबरची स्थिती तसेच हायजिन (स्वच्छता मानके) अशा विविध निकषांच्या आधारे प्रत्येक हॉटेलचे सखोल मूल्यमापन केले जाईल.

या मूल्यांकनानंतर संबंधित हॉटेल्सना अधिकृत ग्रेडिंग व प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल आणि ते दर्शनी भागात लावणे अनिवार्य असेल. जेणेकरून पर्यटकांना त्या हॉटेलच्या दर्जाबाबत स्पष्ट व विश्वासार्ह माहिती मिळेल.

या उपक्रमामुळे नागपूर महानगरपालिकेच्या उत्पन्नातही वाढ होण्यास मदत होईल. कारण नियमांचे पालन आणि नोंदणी अधिक काटेकोरपणे होईल. त्याचबरोबर शहरातील नागरिकांना आणि पर्यटकांना मिळणाऱ्या सेवांचा दर्जा लक्षणीयरीत्या सुधारेल. परिणामी नागपूर शहराबद्दल पर्यटकांमध्ये विश्वासार्हता व आकर्षण अधिक बळकट होईल आणि नागपूर एक सुबक, शिस्तबद्ध व पर्यटनासाठी अनुकूल शहर म्हणून उदयास येईल.

#VISITNagpur पुस्तिका

परदेशातील अनेक शहरांमध्ये सिटी सेंटरवर पर्यटकांसाठी माहितीपूर्ण पुस्तिका सहज उपलब्ध असतात. त्या पुस्तिकांमध्ये एका दिवसात शहर कसे फिरावे, प्रमुख आकर्षणे कोणती, खाद्यसंस्कृतीची ठिकाणे कोणती याची सविस्तर माहिती दिलेली असते. मात्र, नागपूरसारख्या वेगाने विकसित होत असलेल्या शहरात अशी एकत्रित व अधिकृत माहिती उपलब्ध नाही. ही उणीव लक्षात घेऊन #VisitNagpur या उपक्रमांतर्गत एक सर्वसमावेशक, आकर्षक आणि अद्ययावत माहिती पुस्तिका तयार करण्यात येणार आहे.

या पुस्तिकेमध्ये नागपूरमधील प्राचीन मंदिरांचा जीर्णोद्धार करून तयार होणारे हेरिटेज वॉक, सकाळी चालण्यासाठी योग्य १०,००० स्टेप्स वॉकिंग ट्रॅक व पर्यायी स्थळे, शहरातील सुंदर बगीचे, विविध सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रम, पर्यटकांनी आवर्जून भेट द्याव्यात अशा वास्तू, तसेच नागपूरच्या वैशिष्ट्यपूर्ण ओळखीचे दर्शन घडवणारे अनुभव केंद्र (Experience Centre) यांचा समावेश असेल.

ही पुस्तिका अधिकृतरीत्या प्रकाशित (Launch) करून नागपूरमधील प्रत्येक हॉटेलमध्ये उपलब्ध करून देणे अनिवार्य केले जाईल. जेणेकरून शहरात येणाऱ्या प्रत्येक पर्यटकाला नागपूरची संपूर्ण, सुटसुटीत आणि अद्ययावत माहिती सहज मिळेल. यामुळे नागपूरचा पर्यटन विकास अधिक गतिमान होईल आणि शहराची एक सकारात्मक, समृद्ध व आकर्षक ओळख निर्माण होईल.

नागपूर शहरातील विविध सांस्कृतिक, पारंपरिक, औद्योगिक तसेच क्रीडा उत्सवांचे एकत्रित वार्षिक फेस्टिव्हल कॅलेंडर तयार करण्यात येईल. या कॅलेंडरमध्ये कस्तुरचंद पार्क येथील रावण दहन, तान्हा पोळा, साहित्य

संम्मेलन/लिटरेचर फेस्टिव्हल्स, Advantage Vidarbha, AgriVision, सावजी फूड फेस्टिव्हल, तसेच मारबत महोत्सव यांसारख्या प्रमुख महोत्सवांसोबतच मॅरेथॉन, सायकल रन आणि टायगर रन यांसारख्या क्रीडा उपक्रमांचाही समावेश करण्यात येईल.

हे कॅलेंडर #VisitNagpur या उपक्रमांतर्गत डिजिटल व ऑफलाइन माध्यमांतून व्यापकपणे प्रसारित करण्यात येईल, ज्यामुळे नागपूरच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाला चालना मिळेल, नागरिकांचा सहभाग वाढेल आणि पर्यटनाला मोठी गती मिळेल.

अमृत महोत्सवी कॉफी टेबल बुक

माजी महापौर अनिल जी सोले यांच्या महापौरपदाच्या कार्यकाळात २०१४ पर्यंत नागपूर महानगरपालिकेचा इतिहास व्यवस्थित संकलित करून जतन करण्यात आला होता. मात्र त्यानंतरच्या २०१४ ते २०२६ या कालखंडातील महत्त्वपूर्ण घडामोडी, विकासकामे, धोरणात्मक निर्णय आणि शहराच्या प्रगतीचा आलेख यांचे समग्र दस्तऐवजीकरण अद्याप शिल्लक आहे. ही उणीव भरून काढण्यासाठी नागपूर महानगरपालिका आता पुढाकार घेत असून २०१४ पर्यंतच्या इतिहासाच्या धाग्याला पुढे नेत २०२६ पर्यंतचा अद्ययावत आणि सुसंगत इतिहास नव्याने संकलित व लेखबद्ध करण्यात येणार आहे.

या उपक्रमांतर्गत शहराच्या पायाभूत सुविधांतील बदल, नागरी सेवा सुधारणा, महत्त्वाकांक्षी प्रकल्प, सामाजिक-सांस्कृतिक उपक्रम तसेच नागपूरच्या सर्वांगिण विकासाचा प्रवास यांचा सखोल आढावा घेतला जाईल. विशेष म्हणजे अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून या संपूर्ण इतिहासाचे आकर्षक, दर्जेदार आणि संग्राह्य असे कॉफी टेबल बुक स्वरूपात प्रकाशन करण्यात येईल.

हे पुस्तक केवळ माहितीपर दस्तावेज न राहता, नागपूरच्या समृद्ध प्रवासाचे दर्शन घडवणारे, छायाचित्रांनी समृद्ध आणि प्रत्येक नागपूरकराला अभिमान वाटावा असे एक विशेष स्मरणिकेचे रूप धारण करेल. शहराच्या भूतकाळ, वर्तमान आणि भविष्याचा दुवा साधणारे हे प्रकाशन प्रत्येक नागपूरकरासाठी 'हवेहवेसे' वाटणारे आणि जतन करून ठेवावे असे मौल्यवान दस्तऐवज ठरेल.

नागपूर महानगर पालिका डायरी

नागपूर महानगरपालिकेकडून पूर्वी प्रकाशित केली जाणारी 'पॉकेट डायरी' ही नागरिकांसाठी आणि लोकप्रतिनिधींसाठी अत्यंत उपयुक्त ठरत होती. या परंपरेला नव्या स्वरूपात पुढे नेत, अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून आता एक अद्ययावत, स्मार्ट आणि सर्वसमावेशक पॉकेट डायरी तयार करण्यात येणार आहे.

या डायरीमध्ये सर्व नगरसेवकांची नावे, पत्ते, संपर्क क्रमांक आणि ई-मेल आयडी, तसेच सर्व विभाग प्रमुख आणि मुख्य अधिकाऱ्यांचे संपर्क तपशील समाविष्ट असतील. यासोबतच महानगरपालिकेच्या सर्व झोन कार्यालयांचे पत्ते व दूरध्वनी क्रमांक, तसेच महानगरपालिकेची आवश्यक व संक्षिप्त माहितीही दिली जाईल.

डायरीचा वापर अधिक उपयुक्त ठरावा यासाठी नागरिकांना स्वतःच्या नोंदी ठेवता याव्यात म्हणून कोऱ्या पानांचाही समावेश करण्यात येईल. आकर्षक, आधुनिक आणि वापरास सुलभ अशा डिझाइनमुळे ही डायरी नगरसेवकांनाच नव्हे तर सर्वसामान्य नागरिकांनाही तितकीच आवडेल आणि उपयुक्त ठरेल.

या उपक्रमाच्या माध्यमातून नागपूर महानगरपालिका प्रत्येक घरापर्यंत पोहोचण्याचा एक प्रभावी दुवा निर्माण करेल, ज्यामुळे प्रशासन आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक सुलभ पारदर्शक आणि मजबूत होईल.

मत्सालय

Maharashtra Fisheries Department यांच्या माध्यमातून नागपूरमध्ये एक अत्याधुनिक मत्स्यालय (Aquarium) उभारण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प साकार होणार आहे. या प्रकल्पासाठी नागपूर महानगरपालिका आवश्यक जागा उपलब्ध करून देईल, तर फिशरीज विभागाकडून आधुनिक तंत्रज्ञानयुक्त, आकर्षक आणि दर्जेदार मत्स्यालय उभारण्यात येईल.

मा. श्री नितेश राणे यांच्या पुढाकाराने आणि मा. श्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सहकार्याने हा प्रकल्प शक्य होत असून तो नागपूरच्या पर्यटन विकासात एक महत्त्वाचा टप्पा ठरेल.

या अत्याधुनिक मत्स्यालयामुळे नागपूर शहरात एक नवीन पर्यटन आकर्षण निर्माण होईल. ज्यामुळे पर्यटकांची संख्या वाढेल आणि शहराच्या आर्थिक व सांस्कृतिक प्रगतीला चालना मिळेल. यामुळे नागपूर मध्य भारतातील एक प्रमुख पर्यटन केंद्र म्हणून अधिक ठळकपणे उदयास येईल.

लहान मुलांसाठी विशेष

नागपूर महानगर पालिके तर्फे राष्ट्रीयत्व जागृत लहान मुलांमध्ये व्हावे म्हणून सुरेश भट सभागृहात विशेष बाल चित्रपट महोत्सव आयोजित करण्यात येईल. त्यात प्रामुख्याने महात्मा ज्योतिबा फुले ह्यांच्या द्वि शताब्दी निमित्त्य, सरदार वल्लभभाई पटेल हयांची १५० वी जयंती, अहिल्या बाई होळकर ह्यांची ३०० वी जयंती, शिवराज्याभिषेकाची नुकतीच झालेली ३५० वी जयंती च्या उपलक्षाने, महानगर पालिकेच्या विद्यार्थ्यांसाठी तसेच इतर शिशु वर्गासाठी आणि मुलांसाठी या महोत्सवाचे आयोजन निःशुल्क करण्यात येईल.

बालजगत सोबत संयुक्त विद्यमाने काही प्रकल्प राबविण्यात येतील.

महा संगीत

सकाळी ७ ते ८ एक तास ठराविक चौकांवर दररोज महाराष्ट्रातील संस्कृतीवर आधारित संगीत प्रत्येक चौकात मधुर आवाजात वाजवण्यात येईल. दिवसाची सुरुवात मंगलमय वातावरणात आणि सकारात्मक व्हावी ह्यासाठी चा हा प्रयत्न असेल. यासाठी मनपाचे कुठेलेही आर्थिक योगदान नसेल.

पोर्टेबल स्लोटरिंग मशीन प्रती झोन

सद्य स्थिती मध्ये नागपुरात २ अधिकृत स्लॉटरिंग हाउस आहे, पण प्रत्येक झोन निहाय आपण १ असे १० पोर्टेबल स्लॉटरिंग मशीन्स उपलब्ध करून देण्यात येणार असून, त्याद्वारे हायजेनिक आणि तर्कशुद्ध पध्दतीने ह्याचा उपयोग होईल. सगळ्यात महत्वाचे म्हणजे मास मच्छी चे उर्वरित भाग असतात आणि त्याची विल्हेवाट योग्यरित्या न लावल्याने रोगराई वाढते त्या पासून मुक्तता मिळेल.

भूमिगत नाले सफाई साठी लागणाऱ्या यंत्राची खरेदी

सध्या छोट्या मोठ्या मिळून नागपूर शहरात बऱ्याच मशीन्स उपलब्ध आहेत. मानवीय जमादार सोबत ह्या मशीन्स चा उपयोग अत्यावश्यक झाल्या आहे. लहान गल्यानंमध्ये जातील अश्या प्रकारच्या लहान सक्शन, जेटिंग आणि पंपिंग मशीन्स खरेदी करण्यात येतील. प्रत्येक झोन ला आवश्यकतेनुसार त्या उपलब्ध करून दिल्या जातील.

युवकांसाठी सुषमा स्वराज योजना

लहानपणी बहुतांश विद्यार्थ्यांना भविष्यात सरकारी ऑफिसर किंवा कलेक्टर व्हायचे स्वप्न असतात. पण बरेचदा त्याची शिकवणी आणि तयारी अपुऱ्या आर्थिक सहायते मुळे शक्य होत नाही आणि म्हणूनच नागपूर महानगरपालिका ह्या वर्षी पासून प्रत्येक विधानसभेत अगदी माफक दरात विद्यार्थ्यांना युपीएससी आणि एमपीएससी चे प्रशिक्षण उपलब्ध करून देईल. स्वर्गीय सुषमा स्वराज ह्यांनी जसे भारताचे नाव सात समुद्र पलीकडे नेले तसेच आपले विद्यार्थी सुद्धा नागपूर चे नाव जगात उंच करतील ह्या साठी महानगरपालिकेचा हा खारीचा वाटा.

प्रमिलाताई मेढे आंतरराष्ट्रीय भाषा शिकवणी केंद्र

'वसुदैव कुटुंबकम्' ह्या उक्तीनुसार जग अगदी लहान होत चालले आहे आणि कुटुंबाच्या सीमा रुंदावत आहे. अश्यात युवकांचा परदेशी भाषांचा अभ्यास असल्यास त्यांना करियर घडवण्यात मदत मिळते आणि म्हणूनच नागपुरातील एका प्रमुख इ-लायब्ररी मध्ये जपानी, जर्मन आणि फ्रेंच भाषा शिकवणी केंद्र उभारले जाईल.

डॉ. हेडगेवार 'ई'-लायब्ररी चे नुतनीकरण

दक्षिण पश्चिम विधानसभेत अत्रे ले आऊट येथे डॉ. हेडगेवार 'ई' लायब्ररी अस्तित्वात आहे. तेथे जुजबी सुविधा आणि साधारण बेसिक पुस्तके उपलब्ध आहे. पण नागपुरात अशी एकही इ-लायब्ररी नाही जिथे युवक अथवा वैद्यकीय क्षेत्रात अभ्यास करणारे विद्यार्थी वैद्यकीय क्षेत्रातील सर्व साहित्य एकाच ठिकाणी मिळवू शकतील. प. पु. डॉ. हेडगेवार हे स्वतः वैद्यकीय शिक्षण घेतलेले डॉक्टर होते आणि समाजसेवेच्या भावनेतून त्यांनी आयुष्य घडवले. त्यांच्या कार्याला अभिवादन म्हणून महानगरपालिकेतर्फे एक आधुनिक 'ई'-लायब्ररी उभारण्याचा उपक्रम हाती घेतला जात आहे.

या ई-लायब्ररीमध्ये वैद्यकीय क्षेत्रातील सर्वसमावेशक ज्ञानसंपदा उपलब्ध करून देण्यात येईल-ज्यात Allopathy, Homeopathy, Ayurveda तसेच Naturopathy यांसारख्या विविध पद्धतींचा समावेश असेल. विद्यार्थ्यांपासून ते वैद्यकीय व्यावसायिकांपर्यंत सर्वांसाठी ही 'ई'-लायब्ररी ज्ञानाचे एक समृद्ध व्यासपीठ ठरेल. वैद्यकीय क्षेत्रातील हि लायब्ररी अत्याधुनिक तर असेलच पण मध्य भारतातील एकमेव सर्वसमावेशक समर्पित वैद्यकीय 'ई'-लायब्ररी असेल. ह्यात दिव्यांगांसाठी विशेष योजना असेल तसेच ब्रेल साहित्य पण उपलब्ध असेल.

स्टार्टअप

जेन झी (Gen Z) साठी प्रामुख्याने... महाराष्ट्र स्टार्टअप मध्ये अव्वल आहे, पण सगळे स्टार्टअप हे पुणे मुंबई सारख्या शहरातून येतात, त्यात नागपूर कुठे ही मागे न राहावा म्हणून एक अद्ययावत स्टार्टअप इनक्युबेशन सेंटर बनवेल. महानगर पालिका जागा उपलब्ध करून देईल, शासन आणि महानगर पालिका तसेच डिपीसी च्या माध्यमातून नागपूर महानगर पालिका 'जमसेटजी टाटा इनक्युबेशन सेंटर' उभारेल.

तक्रार निवारण सेल

नागपूर महानगरपालिकेचे तक्रार निवारण सेल आय.टी. विभागाद्वारे संचालित करण्यात येते या माध्यमातून नगर सेवकांसाठी वेगळी यंत्रणा विभागाने तयार करावी. जेणेकरून सर्व नगरसेवक या यंत्रणेद्वारे आपल्या तक्रारींची नोंद करू शकतील. नगरसेवकांना आलेल्या तक्रारीचा फोलोअप टेक्नॉलॉजीच्या माध्यमातून येणे सोयीचे होईल व डॅशबोर्डच्या माध्यमातून त्याची नोंद नगरसेवकांकडे असेल. तसेच कमीतकमी मानवी हस्तक्षेप आणि जास्तीत जास्त यंत्रणेचा आणि डिजिटलीकरणासह आधुनिक प्रणाली व तंत्रज्ञानाच्या सहाय्याने जनतेची सेवा करणे अधिक प्रभावी ठरणार आहे.

माझा प्रभाग वायब्रंट / स्मार्ट प्रभाग

या योजनेअतंर्गत स्मार्ट, सस्टेनेबल आणि इको फ्रेंडली तत्वावर ३८ पैकी जो प्रभाग कर सकंलन, पाणी कर संकलन, स्वच्छता, अभिनव योजना राबविण्यात अग्रेशीत असेल त्यांना डिजीटली अद्यावत करण्यासाठी पुरस्कार रूपात ५० लक्ष रूपयांचा निधी देण्यात येईल. हा प्रयोग यशस्वी झाल्यावर सर्व प्रभागात राबविण्याचा स्थायी समितीचा मानस आहे. स्वच्छ मोहल्ला स्पर्धेचे आयोजन करण्यात येईल.

मा. श्री नितिनजी गडकरी आणि मा. श्री. देवेन्द्रजी फडणवीस यांच्या माध्यमातून नागपूरमध्ये Indian Institutes of Management, All India Institute of Medical Sciences आणि Symbiosis International University यांसारख्या जगविख्यात संस्था आल्या. जगभरात अनेक शहरे व संस्थांना अशा नामांकित संस्थांचा थेट लाभ होत असतो. मग नागपूर महानगरपालिकेनेही या संस्थांच्या ज्ञान, संशोधन व कौशल्याचा उपयोग आपल्या विकासासाठी का करू नये ? या विचारातून ही अभिनव योजना पुढे आणण्यात येत आहे.

याच अनुषंगाने Indian Institutes of Management व नागपूर महानगरपालिका यांच्यात एक सामंजस्य करार (MoU) करण्यात येईल. त्याअंतर्गत नागपूर महानगरपालिकेत होत असलेल्या घडामोडींचा सखोल अभ्यास करून तज्ञांकडून आवश्यक सूचना दिल्या जातील. यासोबतच 'इम्पॅक्ट ॲनालिसिस' तसेच जगभरातील उत्कृष्ट पद्धतींचा (गुड प्रॅक्टिसेस) अभ्यास करून त्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला जाईल.

तसेच, संबंधित संस्थांमधील काही इंटर्न नागपूर महानगरपालिकेच्या विविध विभागांमध्ये प्रत्यक्ष काम करत अनुभव घेतील आणि त्या माध्यमातून महानगरपालिकेला उपयुक्त सूचना व मार्गदर्शन मिळेल. याशिवाय, सहा महिन्यांनी (अर्धवार्षिक) एक परिषद आयोजित केली जाईल. एक परिषद त्यांच्या कॅम्पसमध्ये आणि दुसरी नागपूर महानगरपालिकेच्या कॅम्पसमध्ये आयोजित करण्यात येईल.

मजुरांसाठी ठिय्या

नागपूरसारख्या उष्ण हवामानाच्या शहरात उन्हाळयात तापमान अनेकदा ४५°C पर्यंत पोहोचते. तर पावसाळयात अचानक सरी कोसळतात. अशा परिस्थितीत बांधकाम मजूर व रोजंदारी कामगारांना कोणत्याही संरक्षणाविना काम करावे लागते. ही बाब लक्षात घेऊन नागपूर महानगरपालिकेमार्फत मजुरांसाठी संरक्षित 'ठिय्या' (विश्रांती व निवारा केंद्र) उभारण्याचा उपक्रम राबविण्यात येणार आहे, जे त्यांना उन्हापासून व पावसापासून संरक्षण देईल.

या उपक्रमाची सुरुवात प्रायोगिक तत्वावर एका ठिकाणी करण्यात येईल. त्यानंतर त्याची उपयुक्तता लक्षात घेऊन नागपूर महानगरपालिकेच्या सर्व दहा झोनमध्ये हे ठिय्ये टप्प्याटप्प्याने उभारण्यात येतील, ज्यामुळे कामगारांसाठी सुरक्षित व मानवीय सुविधा निर्माण होईल.

महापौर माहेर योजना – नागपूर

१४ जानेवारी रोजी साजऱ्या होणाऱ्या मकरसंक्रांतीच्या पार्श्वभूमीवर, नागपूर शहराच्या बाहेर वास्तव्यास असलेल्या आणि विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या नागपूरच्या कन्यांचे शहराशी असलेले नाते अधिक दृढ करण्यासाठी 'महापौर माहेर योजना' राबविण्यात येईल.

या योजनेअंतर्गत अशा सर्व मानांकित महिलांना नागपूरमध्ये विशेष आमंत्रण देऊन त्यांचे एकत्रीकरण करण्यात येईल. त्या सर्वांना 'माहेरवाशीण' मानून, माननीय महापौरांच्या हस्ते पारंपरिक पद्धतीने ओटी भरून सन्मान करण्यात येईल.

या उपक्रमातून नागपूरच्या कन्यांच्या यशाचा गौरव केला जाईल, तसेच त्यांना शहराच्या विकास प्रक्रियेशी पुन्हा जोडण्याचा प्रयत्न होईल. विविध क्षेत्रांतील त्यांच्या अनुभवांचा उपयोग नागपूरच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक प्रगतीसाठी करण्यात येईल.

महापौर माहेर योजना ही केवळ सन्मानाची परंपरा नसून, नागपूरच्या मुलींच्या कर्तृत्वाला सलाम करणारी आणि शहराशी भावनिक नाते अधिक बळकट करणारी एक अर्थपूर्ण पहल ठरेल.

पर्यावरण

'पंच परिवर्तन' मधील पर्यावरण संरक्षण या अंगाने नागपूर शहरात ५ जून जागतिक पर्यावरण दिन ते २१ जून आंतरराष्ट्रीय योग दिन या कालावधीत १५ दिवसांचा व्यापक जनसहभाग उपक्रम राबविण्यात येईल. ५ जून पर्यावरण संवर्धनाची जाणीव करून देते, तर २१ जून निरोगी जीवनशैलीचा संदेश देते. या दोन दिवसांदरम्यानचा कालावधी स्वच्छ, निरोगी आणि सजग नागपूर घडवण्यासाठी अत्यंत प्रेरणादायी ठरेल.

या अभियानांतर्गत नागरिकांना 'मी माझ्या गल्लीचा ॲम्बेसेडर' ही भावना स्वीकारण्याचे आवाहन करण्यात येईल. आपली गल्ली स्वच्छ ठेवणे, शहराला ब्लॅक स्पॉट फ्री बनवणे, नाग नदी, पोहरा नदी आणि पिवळी नदी यांसारख्या नद्यांमध्ये कचरा न टाकणे, तसेच सार्वजनिक ठिकाणी स्वच्छतेची जबाबदारी पाळणे यावर भर दिला जाईल. ऐतिहासिक वास्तू, तलाव आणि बगीचे स्वच्छ ठेवण्यासाठी लोकसहभागातून सकारात्मक गोष्टीतून तयार करण्यात येईल.

या उपक्रमात वृत्तपत्रे, रेडिओ चॅनेल्स, स्वयंसेवी संस्था (NGO) तसेच शाळांमधील विद्यार्थी यांचा सक्रिय सहभाग राहील. विविध भागांमध्ये NGO च्या माध्यमातून प्रत्यक्ष स्वच्छता मोहिमा राबविल्या जातील. सर्व नगरसेवकांनी पुढाकार घेऊन आपल्या विभागातील जास्तीत जास्त नागरिकांना या अभियानाशी जोडण्याचे आवाहन करण्यात येईल.

यासोबतच प्रत्येक पौर्णिमेला एक तास लाईट्स बंद ठेवण्याचा उपक्रम पुन्हा सुरू करण्यात येईल, ज्यातून ऊर्जा बचतीचा व पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला जाईल.

तसेच नागपूरकरांच्या सहभागातून ५ लाख झाडे लावण्याचा संकल्प पूर्ण करण्यात येईल. 'Need of the Hour' म्हणून रेन वॉटर हार्वेस्टिंग सारख्या उपक्रमांना गती देण्यात येईल. शहरातील जुन्या विहिरींचे पुनर्जीवन करून, त्याठिकाणी लघु नळ योजना राबवून पाण्याची समस्या कमी करण्याचा ठोस प्रयत्न करण्यात येईल.

या सर्व उपक्रमांच्या माध्यमातून 'माझे शहर-स्वच्छ शहर' ही भावना रुजवून नागपूरला अधिक स्वच्छ, हरित आणि पर्यावरणपूरक शहर बनवण्याचा हा सामूहिक संकल्प असेल.

पश्चिम नागपुरातील बाजीप्रभू नगर स्थित महानगरपालिकेच्या उद्यानाचे नाव नरवीर बाजीप्रभू देशपांडे करण्यात येईल.

डिजीटलायझेशन

डिजीटलायझेशन या उपक्रमांतर्गत नागपूर महानगरपालिकेकडून कर, पाणीपुरवठा आदी विविध विभागांसाठी अत्याधुनिक चॅटबॉट प्रणाली विकसित करण्यात येणार आहे. या प्रणालीमध्ये

एआय-आधारित ऑडिओ व टेक्स्ट चॅटबॉट्सचा समावेश असेल, ज्यामुळे नागरिकांना त्यांच्या प्रश्नांची तत्काळ आणि अचूक उत्तरे मिळू शकतील.

या उपक्रमामुळे मानवी हस्तक्षेपाची गरज कमी होऊन सेवा अधिक वेगवान, पारदर्शक आणि कार्यक्षम पद्धतीने उपलब्ध होतील. तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून नागरिकांना जास्तीत जास्त सुविधा पुरवण्याचा उद्देश असून, हा प्रयोग यशस्वी ठरल्यानंतर इतर विभागांमध्येही या प्रणालीचा टप्प्याटप्प्याने विस्तार करण्यात येईल.

डेटा सेंटर

डिजिटल युगात सुरक्षित आणि विश्वासार्ह डेटा व्यवस्थापन ही अत्यंत महत्त्वाची गरज बनली आहे. नागपूरमध्ये उभारणी होत असलेल्या डेटा सेंटर्सचा विचार करता, महानगरपालिकेने या क्षेत्रात दूरदृष्टीने ठोस पावले उचलणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेने येऊ घातलेल्या डेटा सेंटर्समध्ये स्वतःसाठी स्वतंत्र व सुरक्षित जागा राखीव ठेवून शहराचा सर्व महत्त्वपूर्ण डेटा सुरक्षित ठेवावा. पर्यायाने, महानगरपालिकेने स्वतःचे अत्याधुनिक डेटा सेंटर उभारून सर्व विभागांचा डेटा एकत्रित, सुरक्षित आणि सुलभ पद्धतीने व्यवस्थापित करावा.

यामुळे केवळ डेटा सुरक्षितता आणि कार्यक्षमता वाढणार नाही, तर महानगरपालिकेला एक विश्वासार्ह डिजिटल संस्था म्हणून ओळख मिळेल. स्वतःचे डेटा सेंटर उभारल्यास, आसपासच्या नगरपालिकांना व शासकीय संस्थांना डेटा स्टोरेज व व्यवस्थापनाच्या सेवा उपलब्ध करून देत, महानगरपालिका अतिरिक्त उत्पन्नाचे (Revenue Generation) साधनही निर्माण करू शकते.

ही पुढाकार नागपूरला डिजिटल पायाभूत सुविधांमध्ये अग्रस्थानी नेणारी ठरेल.

नागपूर जीरो कार्बन फुटप्रिंट च्या दिशेने अग्रेसर

'सुस (बिडी) प्रकल्प सुरू होताच नागपूर शहर शून्य-कार्बन फूटप्रिंटकडे पहिले ठोस पाऊल टाकेल.'या उपक्रमातून स्वच्छ ऊर्जा, ऊर्जा बचत आणि पर्यावरणपूरक उपायांना चालना मिळून शहराच्या शाश्वत विकासाला गती मिळेल.

महापौर महिला स्वावलंबन बाजार योजना

नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील महिला उद्योजिकांसाठी महापौर महिला स्वावलंबन बाजार योजना अंतर्गत स्थायी बाजारपेठ महानगरात उपलब्ध करून दिली जाईल. ज्यामुळे त्यांना स्वतःचा व्यवसाय वाढविण्याची संधी मिळेल. तसेच स्थानिक उत्पादनांना आणि महिला स्वावलंबनाला मोठा वाव मिळेल.

इलेक्ट्रिक सोलर योजना

नागपूर महानगरपालिकेमार्फत नागरिकांना स्वच्छ व परवडणारी उर्जा उपलब्ध करून देण्यासाठी 'इलेक्टिक सोलर योजने' अंतर्गत ५००० सोलर शेगड्या वितरीत करण्यात येतील. यामुळे पर्यावरण संरक्षणाला मोठी मदत होईल.

या अर्थसंकल्पात बांधील खर्चाचे त्या त्या पदाअंतर्गत क्षेत्रिय कार्यालय व मुख्यालय दिलेल्या माहितीनुसार तरतुदी या अर्थसंकल्पात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहे. व बांधील खर्चाची यादी त्या विभाकडे उपलब्ध आहे. त्या यादीनुसार तरतुद उपलब्ध करुन देणे विभाग प्रमुखाची जबाबदारी राहील. स्थायी समिती प्रशासनास असे निर्देश देते की, यावर्षीच्या प्रस्तावित कामांसाठी ठेवलेल्या राशी मधुन प्राथाम्याने बांधील खर्चाला किंवा कामांना प्रथम वित्तीय तरतुद उपलब्ध करून द्यावी. त्यानंतर महत्वाचे प्रस्तावित कामांचे प्रस्ताव तयार करावे व त्यास रितसर सक्षम प्राधिकरणाची नियमाप्रमाणे मंजुरी घ्यावी. तसेच अर्थसंकल्पातील ज्या पदाअंतर्गत बांधील महसुली व भांडवली खर्चाची तरतुद स्पष्ट नसेल याचा अर्थ असा की, मुळ पदाअंतर्गत जी प्रस्तावित तरतुद उपलब्ध करून दिलेली आहे. त्यातुनच अशा कामांना वित्तीय तरतुदी उपलब्ध करून द्याव्या असेही निर्देश स्थायी समिती देते.तसेच जे प्रस्तावित कामे या अर्थसंकल्पात दिलेली आहे त्यांस मा.सभागृहाने प्रशासकीय मान्यता द्यावी ही विनंती.

आर्थिक वर्ष २०२५-२६च्या वार्षिक उत्पन्नात झालेली घट बघता उर्वरीत काळात महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ कशी होईल याचा नियोजनबध्द आराखडा प्रशासनाने तयार करावा. मार्च पर्यंत उत्पन्नवाढीसाठी कार्य करावे. जेणे करून शहरातील नागरीकांना योग्य त्या नागरी सुविधा आपण देऊ शकु.

अर्थसंकल्प तयार करतांना ज्यांचे मला सहकार्य लाभले ज्यांनी या अर्थसंकल्पात योग्य दिशा दर्शविली असे, शहरातील ज्येष्ठ नागरीक, सामाजिक संस्था, विविध राजकीय पक्षनेते, पत्रकार, मा. महापौरजी, मा. उपमहापौरजी, सत्ता पक्षनेता, विरोधी पक्षनेता, सर्व माजी स्थायी समिती अध्यक्ष, सर्व पक्षांचे गटनेते व पदाधिकारी, सर्व स्थायी समितीचे सदस्य, नगरसेवक / नगरसेविका, निगम आयुक्त, अधिकारी व कर्मचारी यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त करते. या अंदाजपत्रकाचे काम पूर्ण करण्यासाठी मला ज्या ज्या अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करून अत्यंत कमी वेळात हा अर्थसंकल्प बनविण्यात मदत केली त्यांचे कौतुक करते. या अर्थसंकल्पाबरोबर जे परिशिष्ट जोडण्यात आलेले आहे त्या सर्व परिशिष्टांना सभागृहाने मंजुरी द्यावी अशी मी याद्वारे विनंती करते.


शेवटी एवढेच म्हणेन...

‘वादळांना सांगून ठेवा,
आमची दिशा बदलणार नाही
नागपूरच्या विकासाचा दीप,
कोणत्याही वाऱ्याने विझणार नाही

अडथळ्यांनी रस्ते रोखले तरी,
आमची पावले थांबणार नाहीत
नागपूरच्या प्रगतीचे स्वप्न,
कोणत्याही संकटाने झुकणार नाही

वादळे येतील, टीकाही होईल,
पण निर्धार आमचा ढळणार नाही
नागपूरच्या विकासाचा प्रवास,
आता कोणासाठी थांबणार नाही.’

दिनांक : १९ मे २०२६



शिवानी दाणी-वखरे
सभापती, स्थायी समिती
महानगरपालिका, नागपूर

Nagpur Mahanagar Palika
Budget At Glance

Amounts are in lakh Rupees

Head		FY 26-27 (BE)
A	**Revenue Reciept**	**366978.92**
B	Capital Grant	152960.09
C	Loan	30000.00
D	**Capital Reciept (B+C)**	**182960.09**
E	Deposite	15548.43
F	Advances	3550.02
G	Opening Balance	51261.60
H	**Total Income (A+D+E+F+G)**	**620299.06**
I	Revenue Expenditure	249979.56
J	Capital Expenditure	353021.28
K	Deposite	13198.03
L	Advances	4050.01
M	Balance	50.18
N	**Total Expenditure (I+J+K+L+M)**	**620299.06**
O	Revenue Surplus (I-A)	116999.36

नागपूर महानगरपालिका, नागपूर

नागपूर महानगरपालिका, नागपूर
सन २०२६-२०२७ ची प्रस्तावित आर्थिक परिस्थिती
अंदाजपत्रक 'अ' व 'क' स्थायी समिती द्वारा सूचित

रुपये लाखात

तपशिल	अंदाजपत्रक 'अ'	अंदाजपत्रक 'क'	अंदाजपत्रक 'अ'+'क' एकुण
आय			
१.४.२०२६ ची सुरुवातीची अपेक्षीत शिल्लक			51261.60
सन २०२६-२०२७ चे प्रस्तावित महसुली आय	316740.77	50238.15	366978.92
सन २०२६-२०२७ चे प्रस्तावित भांडवली आय	182960.09	0.00	182960.09
सन २०२६-२०२७ चे प्रस्तावित निक्षेप ठेवी आय	15498.43	50.00	15548.43
सन २०२६-२०२७ चे प्रस्तावित अग्रिम आय	3400.01	150.01	3550.02
एकूण प्रस्तावित आय	518599.30	50438.16	
'क' अंदाजपत्रकात वर्ग करण्यात येणारी राशी उणे 'अ'	100201.94	100201.94	
	418397.36	150640.10	569037.46
सुरूवातीची शिल्लक धरून 'अ' व 'क' अंदाजपत्रकाची एकुण प्रस्तावित आय			620299.06
व्यय			
सन २०२६-२०२७ चा प्रस्तावित महसुली व्यय	164403.44	85576.12	249979.56
सन २०२६-२०२७ चा प्रस्तावित भांडवली व्यय	287967.31	65053.97	353021.28
सन २०२६-२०२७ चा प्रस्तावित निक्षेप ठेवी व्यय	13188.03	10.00	13198.03
सन २०२६-२०२७ चा प्रस्तावित अग्रिम व्यय	4050.00	0.01	4050.01
'अ' व 'क' अंदाजपत्रकाचा एकुण प्रस्तावित व्यय	469608.78	150640.10	620248.88
३१.३.२०२७ अखेरची अपेक्षित शिल्लक			50.18

नागपूर महानगरपालिका, नागपूर

नागपूर महानगरपालिका, नागपूर
सन २०२५-२०२६ ची सुधारीत आर्थिक परिस्थिती
अंदाजपत्रक 'अ' व 'क' स्थायी समिती द्वारा सुचित

रुपये लाखात

तपशिल	अंदाजपत्रक 'अ'	अंदाजपत्रक 'क'	अंदाजपत्रक 'अ'+'क' एकुण
आय			
१.४.२०२५ ची सुरुवातीची अपेक्षीत शिल्लक			69887.48
सन २०२५-२०२६ चे प्रस्तावित महसुली आय	276228.89	41512.60	317741.49
सन २०२५-२०२६ चे प्रस्तावित भांडवली आय	137598.24	0.00	137598.24
सन २०२५-२०२६ चे प्रस्तावित निक्षेप ठेवी आय	12766.13	126.00	12892.13
सन २०२५-२०२६ चे प्रस्तावित अग्रिम आय	1859.03	184.01	2043.04
एकूण प्रस्तावित आय	428452.29	41822.61	
'क' अंदाजपत्रकात वर्ग करण्यात येणारी राशी उणे 'अ'	87817.49	87817.49	
	340634.80	129640.10	470274.90
सुरूवातीची शिल्लक धरून 'अ' व 'क' अंदाजपत्रकाची एकुण प्रस्तावित आय			540162.38
व्यय			
सन २०२५-२०२६ चा प्रस्तावित महसुली व्यय	133265.03	82191.48	215456.51
सन २०२५-२०२६ चा प्रस्तावित भांडवली व्यय	227354.86	47185.61	274540.47
सन २०२५-२०२६ चा प्रस्तावित निक्षेप ठेवी व्यय	14801.02	263.00	15064.02
सन २०२५-२०२६ चा प्रस्तावित अग्रिम व्यय	3502.09	0.01	3502.10
'अ' व 'क' अंदाजपत्रकाचा एकुण प्रस्तावित व्यय	378923.00	129640.10	508563.10
३१.३.२०२६ अखेरची अपेक्षित शिल्लक			31599.28

नागपूर महानगरपालिका, नागपूर


नागपूर महानगरपालिकेव्दारा मागासवर्गीय वस्तीकरीता सन २०२६-२०२७ ची प्रस्तावित अंदाजपत्रकात केलेली तरतुद

एकात्मिक अर्थसंकल्पीय सांकेतांक Integretated Budget Code	मागासवर्गीयांच्या राखीव निधी	स्थायी समिती द्वारा सूचित २०२६-२७	मा.म.न.पा. महासभेव्दारे स्वीकृत २०२६-२७
१	२	३	४
A27402020702	मागासवर्गीय विद्यार्थ्यांना गणवेश पुरविणे	5.00	
A27601322905	झोपडपट्टी पुर्नवसन कार्यालय संकीर्ण व्यय	20.00	
A27702020806	प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना पाठयपुस्तक वाटप	5.00	
A27501630802	उद्यान सुधारणा सुस्थीती/दुरूस्ती	100.00	
A27702030803	प्राथमिक शाळा इमारत दुरूस्ती	60.00	
A27702030804	माध्यमिक शाळा इमारत दुरूस्ती	55.00	
A27701330806	दुर्बल घटकांतर्गत सामुदायिक शौचालयाची दुरूस्ती व देखभाल	483.70	
A27701330805	सिमेंट पेव्हिंग व्दारे सुस्थीती/दुरूस्ती	800.00	
A27601340705	झोपडपट्टी पुर्नवसन कार्यालय वेतनाकरीता म.न.पा. चे अंशदान	40.00	
A27702042406	प्राथमिक व माध्यमिक शाळेतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती	5.00	
	एकुण महसुली खर्च	1573.70	
A47101171504	पाचपावली सुतिकागृह मशीनरी खरेदी व ब्लड स्टोअरेज करीता/सिकलसेल डे केअर युनिट	20.00	
A47201271305	डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रम साफल्य आवास योजने अंतर्गत सेवानिवृती नंतर किंवा सेवेत असतांना मृत्यु झाल्यास स्थायी सफाई कामगारांच्या पात्र वारसदारास मालकी तत्वावर गृह निर्माण करुन मोफत सदनिका देणे.	5.00	
A47501770706	मागासवर्गीय वस्तीत इलेक्ट्रीक पोल लावणे	400.00	
A47500272907	अध्ययन कक्ष निर्माण	100.00	
A47501374009	दुर्बल घटक वस्तीतील विविध विकास कामे व सुधारणा	1000.00	
A47501370511	रस्त्यांचे निर्माण	500.00	
A47501371912	भुमिगत नाली बांधणे	1200.00	
A47501272313	स्वस्तप्रकारचे संडास निर्मीती	250.00	
A47502072714	प्राथमिक शाळा भवन निर्माण	342.00	
A47502072815	माध्यमिक शाळा भवन निर्माण	10.00	
A47601360601	BSUP घरकुल योजनेअंतर्गत म.न.पा. चा सहभाग	200.00	
A47601361302	एस.सी. व नवबौध्दांकरीता रमाई घरकुल आवास योजना	3000.00	
A47601361403	म न पा च्या सफाई कर्मचारीकरीता घरकुल योजना	100.00	
A47501374008	दलित वस्तीतील कामे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलीत वस्ती सुधार योजना	9000.00	
A47601361404	भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना अनुसूचीत जाती व नवबौध्द घटकांच्या वस्त्यांमध्ये मुलभुत सुविधा पुरविणे	3500.00	
	एकूण भांडवली खर्च	19627.00	
	एकूण महसूली व भांडवली खर्च	21200.70	

नागपूर महानगरपालिका, नागपूर

नागपूर महानगरपालिकेचा २०२६-२७ चा अपेक्षित उत्पन्नाचा आलेख रूपया असा येईल

आलेख-१




सर्व महसुली कार्यात्मक समुहाची एकुण कराव्दारे आय	5.65
सर्व महसुली कार्यात्मक समुहाची एकुण करेत्तर आय	14.86
सर्व महसुली कार्यात्मक समुहाची एकुण महसुली अनुदान आय	38.77
सर्व महसुली कार्यात्मक समुहाची एकुण इतर आय	5.21
सर्व भांडवली कार्यात्मक समुहाची एकुण अनुदानाव्दारे आय	26.88
सर्व भांडवली कार्यात्मक समुहाची एकुण कर्जाव्दारे आय	5.27
सर्व ठेवी कार्यात्मक समुहाची एकुण निक्षेप व ठेवीव्दारे आय	2.73
सर्व अग्रीम कार्यात्मक समुहाची एकुण अग्रीमव्दारे आय	0.62

नागपूर महानगरपालिका, नागपूर

नागपूर महानगरपालिकेचा २०२६-२७ चा अपेक्षित खर्चाचा आलेख रूपया असा जाईल

आलेख-२




सर्व महसुली कार्यात्मक समुहाचा एकुण आस्थापना व्यय	15.76
सर्व महसुली कार्यात्मक समुहाचा एकुण प्रशासकीय व्यय	2.66
सर्व महसुली कार्यात्मक समुहाचा एकुण प्रवर्तन /सुस्थीती/दुरूस्ती व्यय	15.68
सर्व महसुली कार्यात्मक समुहाचा एकुण इतर व्यय	0.00
सर्व महसुली कार्यात्मक समुहाचा म.न.पा.च्या योजना व कार्यक्रम पुर्ण करणे /अंशदान /आर्थिक सहाय एकुण व्यय	6.21
सर्व भांडवली कार्यात्मक समुहाचा एकुण भांडवली व्यय	31.99
सर्व भांडवली कार्यात्मक समुहाचा एकुण अनुदान/आर्थिक सहायता व्यय	22.80
सर्व भांडवली कार्यात्मक समुहाचा एकुण कर्ज /व्याज /वित्तीय आकार व्यय	1.89
सर्व भांडवली कार्यात्मक समुहाचा एकुण म.न.पा.च्या योजना व कार्यक्रम पुर्ण करणे /अंशदान /अनुदान व्यय	0.24
सर्व कार्यात्मक समुहाचा एकुण निक्षेप व ठेवी व्यय	2.13
सर्व कार्यात्मक समुहाचा एकुण अग्रिम व्यय	0.65

नागपूर महानगरपालिका, नागपूर

नागपूर महानगरपालिकेचे मागील ३ वर्षाचे 'अ' आणि 'क' एकत्रित उत्पन्न दर्शविणारा तसेच २०२६-२७ चा प्रस्तावित आलेख

आलेख-३



	२०२२-२३ वास्तविक	२०२३-२४ वास्तविक	२०२४-२५ वास्तविक	मा.म.न.पा. महासभेव्दारे स्वीकृत सन २०२५-२६	२०२६-२७ सालचे प्रस्तावित स्थायी समिती द्वारा सूचित
एकुण कराव्दारे आय	23383.32	23000.11	21778.42	27969.50	32168.31
एकुण करेत्तर आय	51592.69	53280.69	59196.30	77868.74	84584.53
एकुण महसुली अनुदान आय	160639.12	173295.27	171290.23	55928.76	220600.15
एकुण इतर आय	8307.13	28124.94	26571.59	32824.54	29625.93
एकुण भांडवली अनुदानाव्दारे आय	42247.57	199724.92	46737.34	125965.02	152960.08
एकुण भांडवली कर्जाव्दारे आय	0.10	0.00	0.00	1.01	30000.01
एकुण निक्षेप व ठेवीव्दारे आय	7491.20	5234.52	7520.34	12127.25	15548.43
एकुण अग्रीमव्दारे आय	2596.17	712.79	166.01	2051.02	3550.02

नागपूर महानगरपालिका, नागपूर

२०२५-२०२६ चे सुधारित व
२०२६-२०२७ चे प्रस्तावित

उत्पन्न व खर्च अंदाजाचा एकत्रित गोषवारा
व
मुख्य उत्पन्न-मुख्य खर्च अंदाजाचा एकत्रित गोषवारा

(रूपये लाखात)

सन २०२५-२६ चे सुधारित व सन २०२६-२७ चे प्रस्तावित
'अ' व 'क' अंदाजपत्रक शिल्लक ,आय व व्यय गोषवारा

अ.क्र.	लेखाशिर्ष	सन २०२५-२६ चे स्वीकृत अंदाजपत्रक		सन २०२५-२६ चे सुधारित	
		आय	व्यय	मा. आयुक्त द्वारा सुधारित	
				आय	व्यय
1	2	3	4	5	6
